cmyk

## संपादकीय

### पालकमंत्रिपदाचे ऑलिम्पिक

महायुतीला विधानसभा निवडणुकीत राक्षसी बहुमत मिळाले. युती सरकारची स्थापना होऊन महिना उलटला. आता जनतेच्या कल्याणकारी योजना मार्गी लागणार अशा आशा निर्माण झाल्या; परंतु कसचे काय! जनतेचे कल्याण राहिले बाजूला उलट मुख्यमंत्रिपद ते मंत्र्यांचे खातेवाटप यात विविध क्रीडा प्रकार सुरू झाले. प्रथम मुख्यमंत्रिपदाचा घोळ झाला नंतर मंत्रिमंडळाचा पायघोळ सुरू झाला. अखेर मंत्रिमंडळाची रचना झाली. ती होताना कबड्डी, खो-खो, सूरपारंब्या, नुरा कुस्ती आदींचे दर्शन घडले. क्षणभर मंत्रिमंडळाचे ऑलिम्पिकच सुरू झाले की काय, असे वाटले. मंत्रिमंडळाचे खातेवाटप करताना महायुतीतील घटक पक्षांत घमासान झाले.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... ©email:rajyaloktantra75@gmail.com

बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-२४२ | बुधवार, दि.२५ डिसेंबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने- ६ | किंमत ३ रूपये


### उद्धव ठाकरेंकडून मुंबई महापालिका निवडणुकांची तयारी

मुंबई : विधानसभा निवडणुकीत मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागल्याने उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेपुढे अस्तित्वाची लढाई लढण्याचे आव्हान उभे आहे. पक्ष पुन्हा मजबुतीने उभा करायचा असेल तर येणारी मुंबई महानगरपालिकेची निवडणूक जिंकावीच लागेल. ही निवडणूक पक्षासाठी अस्तित्वाचीच लढाई ठरणार आहे. त्यामुळे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी या निवडणुकीसाठी आतापासूनच तयारी सुरु केली आहे. जानेवारी महिन्यापासून उदधव ठाकरे स्वत: शाखापातळीवर भेटी देणार असून शाखाप्रमुखांपासून स्थानिक पदाधिकाऱ्यांशी संवाद साधणार आहेत.

# शेतकऱ्यांच्या विकासासाठी कृषी विभागाचा नवा प्लॅन

## कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी ठरवली पुढील दिशा



**नाशिक। प्रतिनिधी**

**मंत्रिमंडळ विस्तारानंतर महायुतीच्या मंत्र्यांना आता खाते वाटप देखील करण्यात आले आहे. खातं जाहीर होताच त्या त्या खात्याचे मंत्री ॲक्शन मोडमध्ये आल्याचे पाहायला मिळत आहे. यावेळी राज्याचे कृषीमंत्रिपद हे महायुतीमध्ये राष्ट्रवादी अजित पवार गटाला देण्यात आले आहे. माणिकराव कोकाटे हे राज्याचे नवे कृषीमंत्री आहेत. दरम्यान मंगळवारी माणिकराव कोकाटे हे लासलगाव दौऱ्यावर होते, यावेळी बोलताना त्यांनी आपल्या कामाची पुढील दिशा स्पष्ट केली. शेतकऱ्यांच्या विकासासाठी नवा प्लॅन काय असणार हे त्यांनी सांगितले आहे.**

यावेळी बोलताना कृषीमंत्री माणिकराव कोकाटे म्हणाले, कृषीमंत्री झाल्यानंतर पहिला दौरा आहे, आमचे मित्र कल्याणराव यांच्या घरी आलो आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी आम्ही मागणी केली होती. माझ्या वाट्याला आता कृषी खाते आले आहे. कृषी खातं हे जबाबदारीचे खातं असून तो काटेरी मुकुट आहे. अवकाळी पाऊस, बाजारभाव असे अनेक प्रश्न निर्माण होत असतात. धोरणात्मक निर्णय घेण्याचा प्रयत्न असेल, शेतीच्या क्षेत्रात कायम जे प्रश्न निर्माण होत असतात त्यावर निर्णय घेतले जातील, असे माणिकराव कोकाटे यांनी म्हटले आहे.

दरम्यान पुढे बोलताना ते म्हणाले की, विम्याच्या संदर्भात कोणी गैरफायदा घेतला तर त्याची चौकशी करून कारवाई केली जाईल. शेतकऱ्याचा मुलगा आहे, त्यामुळे मला शेतकऱ्यांचे प्रश्न माहित आहेत. ओला दुष्काळ पडला असेल तर त्यावर निर्णय येत्या काळात घेऊ. युती सरकार भक्कम आहे. मी कोणाच्या विरोधामुळे लासलगावला ◀◀ पान २ वर

### पिकविम्या संदर्भात गैरफायदा घेतला तर याद राखा

गेल्या काही दिवसापासून राज्यातील विविध जिल्ह्यात पिक विम्याचा गैरफायदा झाल्याचा आरोप सत्ताधारी आमदार तसेच विरोधी आमदारांनी केला आहे. त्यामुळे राज्यात पिक विमा योजनेत मोठा गैरप्रकार झाल्याचे दिसत आहे. त्यातच नुतन कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी पिक विमा योजनेचा गैरफायदा घ्याल तर याद राखा, असा इशारा दिला आहे.

## जगातील सरकारी कर्ज ८४.६६ लाख कोटींवर!

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

जागावरील कर्जाचे ओझे दिवसेंदिवस वाढत आहे. विकसित असो किंवा विकसनशील देश, सर्वच सरकारे कर्ज घेऊन काम करत आहेत. परिणामी जागतिक सरकारी कर्ज १०२ ट्रिलियन डॉलर्स म्हणजे सुमारे ८४.६६ लाख कोटी रुपयांवर पोहोचले आहे. आयएमएफ आणि यूएस ट्रेझरी डेटानुसार अमेरिकेवर जगातील सर्वात जास्त कर्ज असून जगातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था म्हणून मिरवणा-या या देशाच्या फेडरल सरकारचे कर्ज ३६ ट्रिलियन डॉलर्सवर पोहोचले आहे, जे देशाच्या जीडीपीच्या सुमारे १२५ टक्के आहे.

विशेष म्हणजे जगाच्या एकूण कर्जापैकी ३४.६ टक्के कर्ज एकट्या अमेरिकेवर असून समस्या अशी आहे की, अर्थव्यवस्थेची गाडी रुळावर परत येत असताना या कर्जावरील व्याजाची परतफेड करण्यासाठी अमेरिकेला खूप पैसे मोजावे लागत आहेत. आयएमएफच्या 'ऑक्टोबर २०२४ वर्ल्ड इकॉनॉमिक आउटलुक'च्या अहवालानुसार २०२३ च्या तुलनेत २०२४ मध्ये जगातील कर्ज ५ ट्रिलियन डॉलर्सने वाढण्याची अपेक्षा असून भविष्यातही कर्ज झपाट्याने वाढण्याची शक्यता आहे. वृद्धत्वाकडे जाणारी लोकसंख्या, आरोग्य सेवांवर वाढता खर्च आणि भू-राजकीय तणाव यामुळे संरक्षण खर्चात ◀◀ पान २ वर

# अंजली दमानियांच्या टार्गेटवर धनंजय मुंडे

## २८ तारखेला बीडमध्ये ठिय्या आंदोलन; नागरीकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन





**बीड। प्रतिनिधी**

**सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांच्या विरोधात मोहिम उघडल्याचे दिसत असून त्यांनी मुंडे आणि वाल्मिक कराड यांची एकत्र जमीन असल्याचे पुरावे माध्यमांसमोर दिले आहेत. दमानिया यांच्या टार्गेटवर मंत्री धनंजय मुंडे असल्याचे दिसत असून त्या दि. २८ डिसेंबर रोजी बीडमध्ये ठिय्या आंदोलन करणार असून या आंदोलनात राज्यभरातील नागरीकांनी सहभागी व्हावे असे आवाहन त्यांनी केले आहे.**

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख खुन प्रकरणानंतर मंत्री धनंजय मुंडे यांना चोहुबाजूने टार्गेट करण्यात येत आहे. वाल्मिक ◀◀ पान २ वर

### धनंजय मुंडे यांची कोंडी

यापुर्वी आ. सुरेश धस, आ. जितेंद्र आव्हाड, आ. संदिप क्षीरसागर यांनी मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर वेगवेगळ्या मुद्द्यावर जोरदार हल्लाबोल केला. एकप्रकारे अधिवेशनात मुंडे यांची कोंडी केली. त्यानंतर आता अंजली दमानिया यांनी आपला मोर्चा मुंडे यांच्याकडे वळवल्याने त्यांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे.

### १२२२ शस्त्र परवाने; अनधिकृत किती?

संतोष देशमुख खुन प्रकरणानंतर बीड जिल्हा राज्याच्या पटलावर आहे. गोळीबार, खुन, दरोडे, हाणामाऱ्या हे बीड जिल्ह्यात वारंवार घडतात. जिल्ह्यात १२२२ शस्त्र परवाने असून वाल्मिक कराड गँगच्या दोघांकडे शस्त्र परवाने असल्याचे अंजली दमानिया यांनी सांगितले. अधिकृत परवाने एवढे असतील तर जिल्ह्यात अनधिकृत परवाने किती असतील असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

### » कैलाश फडवर गुन्हा दाखल; व्हायरल व्हिडीओ भोवला

परळीतील कैलाश फड यांचा हवेत गोळीबार करतानाचा व्हिडीओ शिंदे शिवसेनेचे जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर यांनी फेसबुकवर व्हायरल करीत प्रश्न उपस्थित केला होता. त्यानंतर अंजली दमानिया यांनी पोलिस अधिक्षक नवनीत काँवत यांना सदरील व्हिडीओ पाठवून कारवाईची विनंती केली होती. त्यानुसार पोलिस अधिक्षकांना कैलास फड याच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# फडणवीसांनी सांगितले बीडचा पालकमंत्री कोण ठरवणार?

## मुंडे बहिण -भावांना होणाऱ्या विरोधामुळे मुख्यमंत्र्यांची सावध भुमिका







**मुंबई। प्रतिनिधी**

**गेल्या काही दिवसापासून पंकजा मुंडे आणि त्यानंतर धनंजय मुंडे यांना वेगवेगळ्या मुद्द्यावरुन टार्गेट करण्यात येत आहे. संतोष देशमुख खुन प्रकरणानंतर तर मुंडे बहिण - भावाला कडवा विरोध होताना दिसत आहे. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सावध भुमिका घेतल्याचे दिसत आहे. बीडचा पालकमंत्री कोण ठरवणार हे मुख्यमंत्र्यांनी सांगून टाकले आहे.**

राज्यात महायुतीला स्पष्ट बहुमत मिळाले आहे. त्यानंतर पाच डिसेंबरला नव्या मंत्रिमंडळाचा शपथविधी झाला. मंत्रिमंडळाच्या शपथविधीनंतर अधिवेशनाच्या एक दिवस आधी महायुतीच्या मंत्रिमंडळाचा विस्तार झाला आणि अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी मंत्र्यांना खात्याचे वाटप देखील करण्यात आले. दरम्यान खाते वाटपानंतर आता सर्व राज्याचे लक्ष लागले आहे ते म्हणजे पालकमंत्रिपदाच्या वाटपाकडे, महायुतीमध्ये अनेक जागांवर पालकमंत्रिपदावरून रस्सीखेच असल्याचे दिसून येत आहे.

सध्या बीड जिल्हा सर्वाधिक चर्चेमध्ये आहे, काही दिवसांपूर्वी ◀◀ पान २ वर

# तुमचाही संतोष देशमुख करु

## तानाजी सावंत यांच्या पुतण्यांना जीवे मारण्याची धमकी

**धाराशिव। प्रतिनिधी**

**शिवसेना नेते तानाजी सावंत यांच्या दोन पुतण्यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. तुमचा देखील संतोष देशमुख करु, अशी धमकी अज्ञात आरोपींनी पत्राच्या माध्यातून दिली आहे. संबंधित धमकीचे वृत्त समोर आल्यानंतर एकच खळबळ उडाली आहे.**

महाराष्ट्रात कायदा आणि सुव्यवस्थेवर वारंवार प्रश्न उपस्थित होत आहेत. बीडच्या केज तालुक्यात मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांचे आधी अपहरण केले. त्यानंतर अतिशय निर्घृणपणे त्यांची हत्या केली. शिवसेनेचे ज्येष्ठ नेते तथा राज्याचे माजी आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांच्या २ पुतण्यांना जीवे मारण्याची धमकी आली आहे. तुमचादेखील संतोष देशमुख करु, अशी धमकी हल्लोखारांनी पत्रातून दिली आहे. त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे विधानसभा निवडणुकीआधी धनंजय सावंत यांच्या घरावर गोळीबार झाला होता. धनंजय सावंत हे धाराशिव जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष आहेत. धनंजय ◀◀ पान २ वर

# पदभार स्विकारताच पंकजा मुंडे लागल्या कामाला

### पर्यावरण व वातारणीय बदलाबांबतच्या योजना राबविण्याबाबत सुनियोजित आराखडा तयार करण्याचे दिले निर्देश



मुंबई । प्रतिनिधी

पर्यावरण व वातारणीय बदल या विभागातील राबविण्यात येणा-या योजना, भविष्यातील ध्येय धोरणे, घनकचरा व्यवस्थापन, माझी वसुंधरा अभियान, पाणी, हवा प्रदुषण, नदी व तलाव संवर्धन, पर्यावरण जतन व संवर्धन जनजागृती उपक्रमां विषयी सुनियोजित आराखडा तयार करण्याच्या सूचना राज्याच्या पर्यावरण आणि वातावरणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी विभागांचा आढावा घेताना दिल्या.

खातेवाटप झाल्यानंतर मंत्रिपदाची जबाबदारी येताच ना. पंकजाताई मुंडे यांनी आज सहयाद्री अतिथीगृहात पर्यावरण आणि पशुसंवर्धन विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेतली. यावेळी बोलतांना त्या म्हणाल्या की,राज्यातील घनकचरा व्यवस्थापन,पाणी,हवा प्रदूषण नियंत्रण,नदी व तलाव संवर्धन,पर्यावरण जतन व संवर्धन जनजागृतीपर उपक्रम,राज्यस्तरीय नदी संवर्धन योजना,सागर तटीय विशेष राखीव क्षेत्र नियमन,स्थानिक स्वराज्य संस्थाचे घनकचरा व्यवस्थापन,प्लॅस्टीक निर्मुलन,राज्य नदी संवर्धन योजना,महाराष्ट्र पर्यावरण माहिती प्रणाली केंद्र,सृष्टी मित्र पुरस्कार,माझी वसुंधरा अभियानाची प्रभावी अंमलबजावणी ◀◀ पान २ वर

# लाडक्या बहिणींना २४ तासांच्या आत सरकारचे डबल गिफ्ट

## राज्य सरकारने घेतला मोठा निर्णय; डिसेंबरचा हप्ता या दिवशी मिळणार



**मुंबई। प्रतिनिधी**

लाडक्या बहिणींना २४ तासांच्या आत राज्य सरकारने डबल गिफ्ट दिले आहे. डिसेंबर महिन्याचा हप्ता कधी मिळणार हे आता महिला व बाल कल्याण मंत्री अदिती तटकरे यांनी जाहीर केले आहे. लाडका शेतकरी आणि लाडकी बहिण यांच्यासाठी केंद्राच्या माध्यमातून घरकुल दिल्यावर राज्य सरकारने तातडीने डिसेंबरच्या हप्त्याचा निर्णय घेतला आहे.

ज्या कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न हे अडीच लाखांच्या आत आहे, त्या कुटुंबातील महिलांना आर्थिक आधार मिळावा यासाठी महायुती सरकारनं लाडकी बहीण योजना सुरू केली. अंतरिम अर्थसंकल्पामध्ये या योजनेची घोषणा करण्यात आली होती. ◀◀ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२३ डिसेंबर २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २.५० क्विंटल | २,६०० | २,६०० | २,६०० |
| ज्वारी/हायब्रिड: १३.५० क्विंटल | २,०९० | २,५८० | २,२०६ |
| मका/लोकल: ७.०० क्विंटल | २,१५० | २,१५० | २,१५० |
| तूर : २५.५० क्विंटल | ६,९११ | ७,५०१ | ७,२३८ |
| उडीद : ११.०० क्विंटल | ६,३०० | ७,३०० | ६,७४० |
| बाजरी: ३.०० क्विंटल | २,४४० | २,४४० | २,४४० |
| मुग : १.५० क्विंटल | ६,८०१ | ६,८०१ | ६,८०१ |
| सोयाबीन: १०३.५० क्विंटल | ४,०५० | ४,०६० | ४,०५३ |
| हरभरा: ४.०० क्विंटल | ५,८०० | ५,८०० | ५,८०० |

# रामटेक बंगला नको रे..चंद्रशेखर बावनकुळे अस्वस्थ?

## पंकजा मुंडे बंगला घेण्यास तयार? जो राहतो त्याला राजकीय वनवास







**मुंबई। प्रतिनिधी**

**मंत्र्यांना अलिशान असे सरकारी बंगले दिले जातात. मंत्री सुध्दा आनंदाने अशा बंगल्यात वास्तव्यास जातात. रामटेक हा बंगला अपशकूनच्या चक्रात अडकला असल्याची चर्चा असून रामटेक हा असा बंगला आहे, ज्यात जो मंत्री राहतो त्याला पुढच्या काळात राजकीय संघर्षाला तोंड द्यावे लागले. त्यामुळे मंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे रामटेक बंगला घेण्यावरुन अस्वस्थ असल्याचे म्हटले जात असून पंकजा मुंडे मात्र रामटेक बंगला घेण्यास तयार असल्याची चर्चा आहे.**

रामटेक हा बंगला अलिशान असून तो समुद्र किनारावर असल्याने वातावरण सुध्दा चांगले आहे. मात्र या बंगल्यावरुन बऱ्याच वेगवेगळ्या चर्चा आहेत. हा बंगला अपशकुनी असल्याचे म्हटले जात असून १९९५ साली युतीचे ◀◀ पान २ वर

### अपशकुनी बंगला

रामटेक बंगल्यात स्व. गोपीनाथ मुंडे, छगन भुजबळ, एकनाथ खडसे, दिपक केसरकर यांनी वास्तव्य केले होते. पुढे या सर्वांनाच राजकीय संघर्ष करावा लागला होतो. त्यामुळे हा बंगला घेण्यास मंत्री सहसा नकार देत असल्याचे दिसते. त्यामुळेच की काय हा रामटेक बंगला अपशकुनी असल्याची चर्चा आहे.

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
३
बुधवार दि.२५ डिसेंबर २०२४

## नागरगोजे यांचे आज अमृतमहोत्सवी अभिष्टचिंतन

बीड : केज तालुक्यातील देवगांव येथील रहिवाशी व निवृत्त गटशिक्षणाधिकारी दत्तात्रय नागरगोजे यांच्या अमृतमहोत्सवा निमीत्त बुधवारी (दि. २५) त्यांचा अभिष्टचिंतन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. सायंकाळी पाच वाजता सुर्या लॉन्स येथे हा कार्यक्रम होईल.

शिस्तप्रिय आणि विद्यार्थीप्रिय शिक्षक अशी ओळख असलेले दत्तात्रय नागरगोजे यांनी वयाच्या २२ व्या वर्षी अध्यापन सेवेला सुरुवात केली. त्यांनी दहिफळ वडमाऊली, विडा, वाघेबाभळगाव, येवता, भांटूबा येथे सह शिक्षक व मुख्याध्यापक या पदावर काम केले.

तसेच गंगाखेड येथे त्यांनी गटशिक्षणाधिकारी म्हणूनही सेवा बजावली. गणित विषयाचे अध्यापन करताना त्यांनी विद्यार्थ्यांना वैयक्तीक आयुष्यातही मदतीचा हात दिला. शिस्तप्रिय परंतु मृदु स्वभावाचे व तत्वनिष्ठ अशी त्यांची ओळख आहे. त्यांनी शेतीतही अनेक यशस्वी प्रयोग केले आहेत. त्यांच्या अमृत महोत्सवा निमित्त त्यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

# बीड शहरातील गार्डनचा साडे चार कोटींचा निधी परळी नगरपरिषदेकडे वळविला

## दबावामुळे बीडचे लोकप्रतिनिधींचे मूग गिळून गप्प:अजय सरवदे



बीड। प्रतिनिधी

नगरपालिका क्षेत्रामध्ये प्राथमिक सोयी सुविधांच्या विकास कामासाठी विशेष अनुदान योजनेची अंमलबजावणी करण्यात येते करिता बीड शहरातील पंढरी धानोरा रोड येथे उद्यान विकसित करणे व इतर कामे करणे करिता बीड नगर परिषदेस ५ कोटी रुपये मंजूर करण्यात आले होते. जिल्हाधिकारी पुणे यांच्या स्तरावरून निधी आहारित करण्यात आले आहेत. मंजूर प्रकल्पाचे अंदाजपत्रकीय रकमेच्या ९०% रक्कम ४ कोटी ५० लक्ष रुपये शासन निधी व १०% स्वहिस्सा रक्कम ५० लक्ष रुपये मंजूर केला आहे. जिल्हाधिकारी बीड यांचे प्रशासकीय मान्यता आदेश २०२१/जीबी/डेस्क-१/एमयूएन/१३४९६ दि.०५ ऑक्टोबर २०२१ असे आहेत.

यामध्ये उद्यान विकास अंतर्गत पाच कामे सिविल वर्क होते, लँडस्केप, विद्युत काम, मुलांचे खेळणी बसवणे, ओपन जिमचे काम होणार होते नगरपरिषद बीड यांनी कामास कार्यारंभ आदेशही दिला होता आणि काम चालूही झाले होते परंतु मध्येच हे काम बंद




पडले आहे. वैशिष्ट्यपूर्ण योजनेसाठी प्राप्त ४ कोटी ९६ लक्ष ९८ हजार ८८ रुपये निधी बीड नगर परिषदेस वितरित करणे जिल्हा प्रशासन अधिकारी नगर विकास शाखा श्रेणी-१ जिल्हाधिकारी कार्यालय बीड यांना प्राधिकृत करण्यात आले होते. परंतु तत्कालीन जिल्हाधिकारी, जिल्हा प्रशासन अधिकारी बीड व महिला कर्मचारी यांनी संगनमताने टक्केवारी घेत सदरील निधी नगरपरिषद परळी यांना नियमबाह्य वितरित केला असल्याचे दिसून येत आहे संबंधितांवर कारवाई करण्यात यावी यासाठी वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते अजय सरवदे यांनी काल विभागीय आयुक्त कार्यालयातील उपायुक्त नगरपरिषद प्रशासन विभाग यांचे प्रत्यक्षात भेट घेऊन प्रकरणाचे गांभीर्य लक्षात आणून दिले व त्वरित चौकशी समिती गठीत करून कारवाई करण्यास सांगितले आहे.

### जिल्हाधिकारी यांचे हाताची घडी, तोंडावर बोट

चौकट :- नगरपरिषद प्रशासन विभाग जिल्हाधिकारी कार्यालय बीड (संकलन) या ठिकाणी एका महिला कर्मचाऱ्याकडे गेल्या १३ वर्षांपासून अतिरिक्त कार्यभार असल्यामुळे तेथील कागद ना कागद माहीत असल्याने पदभार सोडण्यास तयार नाही तसेच सदर महिला कर्मचाऱ्याची नियुक्ती लेखा विभागामध्ये आहे. सदर महिला कर्मचारी यांच्यावर राजकीय वरदहस्त असल्याने त्या कोणालाही जुमानत नाहीत. मा.अविनाश पाठक जिल्हाधिकारी बीड यांची प्रत्यक्षात भेट घेऊन कारवाई करावी अशी विनंती केली होती परंतु त्यांनीही ''हाताची घडी तोंडावर बोट ठेवत'' प्रकरणाकडे दुर्लक्ष केले आहे.

## केज येथे कानडीमाळीच्या ग्रा. प. सदस्याचे उपोषण सुरू

केज । प्रतिनिधी

ग्रामसेवक व विस्तार अधिकाऱ्यांनी माहिती न देता मानसिक त्रास देत धमकी, दादागिरी व अरेरावीची भाषा करीत असल्यावरून कानडीमाळी (ता. केज) येथील ग्रामपंचायतीचे सदस्य बालासाहेब दगडू खाडे यांनी सोमवारी पंचायत समिती कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे.

कानडीमाळी ग्रामपंचायतीकडे सन २०२३ व २०२४ या आर्थिक वर्षात शासनाकडून दलित वस्तीसाठी आलेल्या निधी व १४-१५ व्या वित्त आयोगातील खर्चाची किर्द व माहिती अधिकार खाली माहिती ग्रामपंचायतीचे सदस्य बालासाहेब दगडू खाडे यांनी मागवली होती. मात्र संबंधीत ग्रामसेवक व संबंधीत विस्तार अधिकाऱ्याने त्यांना कुठल्याही निधीची माहिती न देता उलट मानसिक त्रास देत धमकी, दादागिरी व आरेरावीची भाषा करीत आहेत.

या संबंधीत अधिकाऱ्याच्या चौकशी करून कार्यवाही करण्यात यावी, सन २०२२ ते २४ पर्यंतच्या दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत झालेल्या कामाची व १४-१५ व्या वित्त आयोगातील खर्चाची एमबी रेकॉर्ड, अंदाजपत्र, कीर्दची झेरॉक्स प्रत देण्यात यावी या मागणीसाठी ग्रामपंचायतीचे सदस्य बालासाहेब दगडू खाडे यांनी सोमवारी पंचायत समिती कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे.

## राज्यस्तरीय मुख्याध्यापक शैक्षणिक संमेलनास उपस्थित राहावे-पैठणे

बीड । प्रतिनिधी

मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि शिक्षणमंत्री यांच्या प्रमुख उपस्थितीत दि.२८ आणि २९ डिसेंबर रोजी लातूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय शैक्षणिक संमेलनास (वार्षिक अधिवेशन) अधिवेशनासाठी बीड जिल्ह्यातील जास्तीत जास्त मुख्याध्यापक व प्राचार्य यांनी सहभागी व्हावे असे आवाहन मराठवाडा मुख्याध्यापक संघाचे विभागीय सचिव तथा जिल्हाध्यक्ष प्राचार्य जे.एम.पैठणे यांनी केले आहे.



या बाबत अधिक माहिती अशी की, अखिल महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संयुक्त महामंडळाचे ६१ वे राज्यस्तरीय शैक्षणिक संमेलन ( वार्षिक अधिवेशन) लातूर शहरातील औसा रोड येथील थोरमोटे लॉन्स येथे दिनांक २८ व २९ डिसेंबर २०२४ रोजी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, शिक्षणमंत्री तसेच वरिष्ठ अधिकारी यांच्या उपस्थितीत होणार आहे. या अधिवेशनात तज्ञांची व्याख्याने व विविध विषयावर प्रश्नावर शोधनिबंध सादर केले जाणार आहेत. तरी या अधिवेशनासाठी बीड जिल्ह्यातील जास्तीत जास्त मुख्याध्यापक/ प्राचार्य बंधू-भगिनींनी उपस्थित राहून शासन स्तरावर प्रलंबित विविध शैक्षणिक प्रश्नांची सोडवणूक होण्यासाठी मुख्याध्यापक संघटनेची एकजूट दाखवावी असे आवाहन (विभागीय सचिव मराठवाडा मुख्याध्यापक संघाचे विभागीय सचिव तथा जिल्हाध्यक्ष प्राचार्य जे.एम.पैठणे,विष्णुपंत रसाळ सर (जिल्हा सचिव बीड जिल्हा मुख्याध्यापक संघ) , मार्गदर्शक भाऊसाहेब बोबडे सर , उपाध्यक्ष शंकर पवार , गणेश घोडके, सहसचिव विनयकुमार केंडे , कोषाध्यक्ष आप्पासाहेब येवले , सहकोषाध्यक्ष रमेशसिंह देसुरकर , सदस्य भीमराव सावंत , प्रदीप गाडे दादासाहेब खोले, गोविंद चव्हाण ,राजाभाऊ घुंबार्डे , अरुण शेप , सुनील कांबळे, सौ . सरला बिंदू , तालुकाध्यक्ष बीड लक्ष्मण इंगोले, गेवराई भक्तराज पौळ ,शिरूर अभिमन्यू घरगिने , वडवणी दत्तात्रय कानडे ,आष्टी राजू आजबे, अंबाजोगाई विलास सोमवंशी , परळी बळवंत चव्हाण , पाटोदा विकास वराट , माजलगाव लक्ष्मण जगताप ,केज सुशील कुमार गायकवाड आणि तालुका सचिव बीड अनिल काळे, गेवराई कल्याण राऊत , शिरूर बाबुराव जायभाये ,वडवणी धुराजी राऊत ,आष्टी तुकाराम डोके , अंबाजोगाई धनंजय शिंदे, परळी रमेश गीते ,पाटोदा अशोक पवार , माजलगाव चंद्रशेखर तौर, केज दिगंबर नागरगोजे यांच्यासह बीड जिल्हा मुख्याध्यापक संघाचे सर्व सदस्य यांनी केले आहे.

## रंजना भावसार उत्कृष्ट युनिट डायरेक्टर पुरस्काराने सन्मानित

वडवणी। प्रतिनिधी

नाशिक येथील सामाजिक कार्यकर्त्या तथा अखिल भारतीय भावसार क्षत्रिय महासभा महाराष्ट्र राज्य महिला परिषदेच्या राज्य सचिव रंजना भावसार यांना वर्षे २०२४ साठी जायंट्स वेल्फेअर फाउंडेशन फेडरेशन २ चा उत्कृष्ट युनिट डायरेक्टर पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.महाराष्ट्रात जायंट्स वेल्फेअर फाउंडेशन, फेडरेशन चे सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात मोठे योगदान आहे.जायंट्स वेल्फेअर फाउंडेशन च्या वतीने राज्य भर विविध उपक्रम राबविले जातात या मध्ये रक्तदान शिबीर ,मुल दत्तक घेणे,वृक्ष लागवड ,गरजुना ताडपत्री वाटप , कॅन्सर पेशंट साठी उपचार , जयपूर फुट्स,सामुहिक विवाह सोहळा , गरीब विद्यार्थ्यांना सर्व प्रकारची मदत आदिंचा समावेश आहे.

या फेडरेशन चे नुकतचे संभाजीनगर येथे वार्षिक अधिवेशन संपन्न झाले या अधिवेशनात नाशिक येथील सामाजिक कार्यकर्त्या तथा अखिल भारतीय भावसार क्षत्रिय महासभा महिला परिषदेच्या महाराष्ट्र राज्य सचिव रंजना भावसार यांचे या वर्षातील अत्यंत प्रशंसनीय कार्य झाले असल्याने त्यांना फेडरेशन अध्यक्ष प्रशांत मालानी यांच्या हस्ते तर संभाजीनगरच्या उप जिल्हाधिकारी अंजली धानोरकर, स्पेशल कमिटी मेंबर सुर्यमाला मालानी , विनोद शेवतेकर,संजय गुगळे, सचिव पल्लवी जोशी नाशिक प्राईड चे सचिव अनिरुद्ध जाजु आदि मान्यवरांच्या उपस्थितीत तर पास्ट प्रेसिडेंट राजेंद्र चव्हाण,नरेश गुप्ता, डॉ गुरुदत्त राजपूत, डॉ संजय नाफाडे, रत्नाकर महाजन यांच्या विशेष उपस्थितीत स्मृती चिन्ह देऊन सन्मानित करत हा पुरस्कार देण्यात आला. संभाजीनगर येथे झालेल्या त्या वर्षे २०२३च्या जायंट्स ग्रुप ऑफ नाशिक स्टार या ग्रुप च्या अध्यक्ष पण भुषविले आहे. रंजना भावसार यांचे सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात भरीव योगदान आहे. रंजना भावसार यांना जायंट्स वेल्फेअर फाउंडेशन, फेडरेशन दोन चा उत्कृष्ट युनिट डायरेक्टर पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे मित्र, मैत्रीण, नातेवाईक, समाज बांधव तसेच सर्व स्तरातून त्यांच्या वर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## पद्मिनी बाई पांचाळ यांच्यावर शोकाकुल वातावरण संस्कार

**खालापुरी । प्रतिनिधी**

शिरूर कासार तालुक्यातील खालापुरी गावचे रहिवासी असलेले व बीड जिल्हा भूमी अभिलेख कार्यालयात कर्मचारी म्हणून काम करत असलेले लक्ष्मण मुंजाबा पांचाळ यांच्या मातोश्री पद्मिनी बाई मुंजाबा पंचाळ वय वर्ष ७२यांचे काल पहाटे च्या सुमारास निधन झाले त्यांचा अंत्यविधी सायंकाळी आठच्या सुमारास खालापूरी येथील स्मशानभूमीत मोठ्या शोकाकुल वातावरणात करण्यात आला या प्रसंगी पदाधिकारी, अधिकारी , सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार, नातेवाईक ,खालापुरी परिसरातील अनेक गावचे ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते त्यांच्या पाश्चात दोन मुले एक मुलगी सुना नातवंडे असा मोठा परिवार असून पांचाळ परिवाराच्या दुःखात दैनिक पार्श्वभूमी परिवार सहभागी आहे



## केएसपी विद्यालयालयाची मोरदरा येथे क्षेत्रभेट

बीड। प्रतिनिधी

दि.२३/१२/२०२४ रोजी शहरातील (कर्मयोगिनी सावित्रीबाई फुले विद्यालय) के.एस.पी विद्यालयामधील इयत्ता ३ री ते ६ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोरदरा येथील पर्यटन स्थळी घेऊन जाण्यात आले. विद्यार्थ्यांना परिसर अभ्यासचे ज्ञान प्रत्यक्षात व्हावे या उद्देशाने मुलांना बीड येथील पालीच्या घाटामध्ये असलेल्या मोरदरा हे पर्यंटन स्थळी घेऊन जाण्यात आले. त्या ठिकाणी श्री महादेव मंदीर, डोंगर, विविध वस्तपती, प्राणी, पक्षी, गोशाळा, या बदल प्रत्यक्ष पहाणी करुन माहीती देण्यात आली. मुलांनी वन भोजन करुन क्षेत्रभेटीचा खुप आनंद घेतला.



तसेच दि.२३.१२.२०२४ रोजी इयत्ता ७ वी ते ८ वी मधील मुलांना नागरिकशास्त्र विषयातील विविध संकल्पना आणखी सोप्या व्हावेत या हेतुने मुलांना बीड येथील पंचायत समिती बीड येथे मुलांना प्रत्येक्षात कृषि विभाग, लेखा विभाग, पाणी पुरवठा विभाग, शिक्षण विभाग, अशा सर्व विभागाची माहीती देण्यात आली. यावेळी पंचायत समितीतील गटविकास अधिकारी अनुरुद्र सानप सर, गट शिक्षणाधिकारी भगवान सोनवने सर, माटे सर यांनी पंचायत समितील सर्व कामकाजाविषयी मुलांना खुप मोलाचे मार्गदर्शक केले. सर्व मुले खुप आनंदी होती. या क्षेत्रभेटीस ऋषिकेशजी शेळके साहेब जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी तथा समग्र शिक्षा विभाग प्रमुख तसेच संस्थाध्यक्षा सौ.अंजली शेळके, यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच शाळेतील प्र.मुख्याध्यापक, विशाल सुपेकर व शाळेतील शिक्षक शिक्षिकेत्तर कर्मचारी यांनी दोन्ही क्षेत्रभेटी उत्साहात संपन्न केल्या.

# ज्ञान घेतले तर प्रतिबंध व उपचारासाठी सदैव तत्तपर-डॉ अनुराधा शेंडगे

अंबाजोगाई। प्रतिनिधी

ग्रामीण विकास मंडळ एमएसएम६५० प्रतिबंध विभाग,महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, मुंबई व जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष, जिल्हा रुग्णालय बीड यांच्या संयुक्त विद्रद्यमाने आयोजित एमएसएम प्रकल्पातील लाभार्थी गट व तृतीयपंथी यांचा स्नेह मेळावा १७ डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आला होता.कार्यक्रमात अध्यक्ष स्वारातीच्या डॉ अनुराधा शेंडगे यादव,समुपदेशक धनराज पवार,समुपदेशक सुकेशनी गंडले,राजेश गोस्वामी, विश्वास लवंद, सुनील घुगे,प्रदीप जिरे,अशोक कसबे,सुनील गायकवाड,प्रकल्पाच्या असंख्य लाभार्थी गट व तृतीयपंथी उपस्थित होते.ग्रामीण विकास मंडळ प्रतिबंध विभाग एमएसएम. प्रकल्पातील लाभार्थी गट व तृतीयपंथी यांचा स्नेह स्नेह मेळावा कार्यक्रमाचे प्रस्ताविक सय्यद फारूख हुसेन सय्यद यांनी केले. संस्था कार्य करत असलेल्या प्रकल्पाची माहिती दिली माता व मातीचे विकासासाठी पीडित वंचित घटकांसाठी संस्था कार्य करत आहे. प्रकल्पातील लाभार्थी गट व तृतीयपंथी यांनी क्वालिटी निर्माण केली की शंभर टक्के ध्येय साध्य होते असे मार्गदर्शन केले.

धनराज पवार, समुपदेशक यांनी एचआयव्ही होण्याची चार करणे सांगून त्या बद्दल सखोल माहिती दिली तसेच व्यसणापासून दूर राहण्याचा व आर्थिक बचत करण्यासाठी मोलाचे मार्गदर्शन केले.समुपदेशक सुकेशनी गंडले यांनी लाभार्थी गट व तृतीयपंथी यांनी आरोग्याच्या बाबतीमध्ये नेहमी जागृत राहणे गरजेचे आहे असे मत मांडले. कुठलाही आजार अंगावर काढू नये थोडाही त्रास होत असेल तर तात्काळ तपासणी करून घ्यावी. एचआरजी पॉप्युलेशन ने आपला ड्यु आला की स्वतः तपासणीला यावं. लवकर तपासणी केली म्हणजे जर काही आजार दिसून आला तर आपल्याला लवकर उपचार सुरू करून आपलं आयुष्यमान व्यवस्थित ठेवण्यास मदत केली जात आसल्याची माहिती दिली. तर प्रदीप जिरे समुपदेशक यांनी एचआयव्ही बाबतीत कलंक व भेदभाव ही गंभीर समस्या आहे. त्या मुळे एचआयव्ही संसर्गित व्यक्तीच्या जीवनावर परिणाम होतो. जे केवळ समाजातील एचआयव्ही विषयीचे अज्ञान व भीती कशी दूर करावी या विषयी माहिती दिली.सुनिल गायकवाड समुपदेशक यांनी गुप्तरोग विभाग एसटीआय विषयी माहिती देऊन उपचारावरती ही मार्गदर्शन केले.लाभयार्थ्यांनी आरोग्याची नियमित काळजी घेऊन सक्षक्त व निरोगी आयुष्य जगले पाहिजे. एचआयव्ही होऊ नये म्हणून स्वतःची काळजी घेतली पाहिजे जर एचआयव्हीचा संसर्ग झाला तर आम्ही काळजीसाठी तुमच्या सोबत आहोतच. समुदायाने आता लीड घेणे गरजेचे आहे. समुदायाने आपल्या नेतृत्वाचा विकास करून आपल्या समस्या सोडवून आपले ध्येय साध्य केले पाहिजे.आपल्या विषयी असलेले समाजात गैरसमज कलंक व भेदभावाची भावना आपण स्वतः दूर केली पाहिजे. समाजाचा प्रत्येकाकडे पाहण्याचा दृष्टिकोन आपणच बदलू शकतो आसे कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप करताना डॉ. अनुराधा शेंडगे (यादव ) म्हणाल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रेखा घाटे यांनी केले तर आभार सय्यद फारुख यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी बालकृष्ण लुंगेकर, समुपदेशक भीमा कांबळे, ओआर डब्ल्यू नंदिनी पांचाळ, प्रियंका पोटभरे, विमल तरकसे, लेखापाल सुरेश शिंदे, अर्शिया पटेल, वाल्मीक पाईक व पियर महालिंग गुळवे यांनी परिश्रम घेतले.

## चोरीच्या उद्देशाने विना नंबर स्वीफ्टसह दोघांना पकडले

उमापूर। प्रतिनिधी

बीड पोलीस अधिक्षक पदाचा पदभार हाती घेताच ठाणे प्रमुखांच्या बैठकीत स्पष्ट आदेश देवुन दोन नंबर चे धंदे बंद करण्याचे आदेश दिले होते या आदेशाची अंमलबजावनी चकलांबा पोलीसांनी सुरु केल्याचे दिसून आले आहे काल रविवार रोजी मध्यरात्रीच्या सुमारास चकलांबा ठाण्याचे सपोउप निरिक्षक अनंता तांगडे हे गस्तीवर असताना विना नंबरची चारचाकी वाहन त्यांना रस्त्यावर उभी असल्याचे दिसुन आल्याने विचारपूस केल्यानंतर समाधानकारक उत्तरे न मीळाल्याने गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

तलवाडा परिसरात शिवाजी चौकात विना क्रंमाकाची पांढऱ्या रंगाची स्विफ्ट गाडीत दोन इसम हे थांबले होते तसेच पोलिसांनी त्यांना विचारपुस केली असता त्यांचे उत्तर समाधान कारक आले नाही तसेच संशय बळावल्यामुळे सदरच्या दोन ईसमा विरूद्ध तलवाडा पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला असून या दोघांचाही गून्हेगारी पार्श्वभूमी असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे तसेच बीड पोलिस अधीक्षक नवनित कॉवत यांनी पदभार घेताच पोलिस यंत्रणा सतर्क झाली आहे, अंगत दूर्गादास परळकर, व अविनाश मुळीक अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत सदरची कार्यवाई बीड पोलिस अधीक्षक नवनित कॉवत, अप्पर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर, उप विभागीय पोलिस अधीकारी नीरज राजगूरू,सपोनि संदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि अंनता तांगडे यांनी केली आहे.

### जाहीरनामा

**तालुका कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार माजलगांव यांचे कार्यालय माजलगांव जि.बीड**

(दंड विभाग)

**दुरध्वनी क्रमांक:०२४४३-२९५०५२**

Email ID : tahsildarmajalgaon @gmail.com

**जा.क्र.२०२४/दंड विभाग/जन्म-मृत्यू नोंद/का.वि. १३६८ दि.१७/१२/२०२४**

संदर्भ : १. मा. भारत सरकार विधी व न्याय विभाग यांचे राजपत्र दिनांक ११.०८.२०२३, २. मा. जिल्हाधिकारी, बीड यांचे आदेश क्र.२०२३/आर.बी-डेरक- ।पोल- १ / जन्म-मृत्यु नोंदणी कायदा-२०२३ दि.१३.१०.२०२३., ३. मा. तालुका कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार माजलगांव यांचे आदेश क्र. २०२४/जन्म-मृत्यू/ कावि १९, दि. २२.०८.२०२४, ४. अर्जदार नामे बाजीराव आहेलाजी आरडे, रा.शेलापुरी ता. माजलगांव जि. बीड यांचा अर्ज दि. ०७.०८.२०२४, जन्म नोंदणी प्रमाणपत्र मिळणेबाबत जन्म-मृत्यु नोदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११ अन्वये सर्व जनतेस याद्वारे जाहीर केले जाते की, अर्जदार नामे बाजीराव आहेलाजी आरडे, रा. ह. मु. शेलापुरी ता. माजलगांव जि. बीड अर्जदार यांनी या कार्यालयास अर्ज सादर करुन असे कळविले आहे की, त्यांचे कुटूंबातील व्यक्तींची जन्मतारीख व जन्मठिकाण खालीलप्रमाणे आहे.

अक्र १. : व्यक्तीचे नांव : बाजीराव आहेलाजी आरडे, अर्जदाराशी असलेले नाते : अर्जदार स्वतः,जन्मतारीख : ०९.०१.१९४५

जन्मठिकाण : हरकी निमगांव, उक्त नमुद अर्जदार / व्यक्तींच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय, हरकी निमगांव ता. माजलगांव, बीड यांचे नोंदवहीमध्ये घेऊन त्याबाबत प्रमाणपत्र मिळावे यासाठी अर्जदार यांनी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करिता उक्त नमुद व्यक्तीची जन्मतारीख व जन्मठिकाण कायदेशीर नाही, असे कोणास या कार्यालयाचे निदर्शनास आणून द्यावयाचे असेल तर या जाहिरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत त्याने / तिने या कार्यालयात हजर राहुन / अर्ज सादर करुन आपल्या हरकती कळवाव्यात. तसेच सर्व जनतेस हेही कळविण्यात येते की, जर विहीत मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखल केल्यास सदर कार्यालय अर्जदार यांच्या हक्काबदल पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास उक्त नमुद जन्मतारीख व जन्मठिकाण याबाबत नोंद कायदेशीर असल्याबाबत पुढील विहित कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

आज दि. १७/१२ /२०२४ रोजी माझे सही व शिक्यानिशी दिला.

**स्वाक्षरित**
**कार्यकारी दंडाधिक**
**तथा नायब तहसिलदारी,माजलगाव**

# शेतकऱ्यांनो पिकं सांभाळा! राज्यात वादळी पावसासह गारपीटीचा इशारा

## कोणत्या भागात काय अलर्ट?

कालपासून राज्यातील विविध भागांमध्ये २७ आणि २८ डिसेंबर दरम्यान मेघ गर्जनेसह पावसाचा अंदाज वर्तवण्यात आलेला आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, या काळात वादळी पावसाची शक्यता असून, काही ठिकाणी गारपीट देखील होण्याची शक्यता आहे. यामुळे शेतकऱ्यांना सावध राहण्याचे आवाहन कृषी विभागाने केले आहे. राज्यात २६ डिसेंबरपासून ढगाळ हवामानाला सुरुवात होणार असून, २६ डिसेंबर रोजी कोल्हापूर, सांगली, आणि सोलापूर जिल्ह्यांतील दक्षिणेकडील काही भागांत पावसाची शक्यता आहे. २७ डिसेंबरला खानदेश (नाशिक विभाग), मध्य महाराष्ट्र (पुणे विभाग), उत्तर मराठवाडा, आणि पश्चिम विदर्भातील विविध भागांमध्ये पावसाच्या शक्यतेसह वादळी वाऱ्यांची परिस्थिती तयार होण्याचा अंदाज आहे. २८ डिसेंबरला खानदेश, मराठवाडा आणि विदर्भातील काही भागांत जोरदार पावसाची शक्यता आहे.



२६ डिसेंबर रोजी कोल्हापूर, सांगली, सोलापूर जिल्ह्यांतील दक्षिणेकडील तुरळक भाग; २७ डिसेंबर रोजी खानदेश (नाशिक विभाग), मध्य महाराष्ट्र (पुणे विभाग), उत्तर मराठवाडा, आणि पश्चिम विदर्भातील विविध ठिकाणी; आणि २८ डिसेंबर रोजी खानदेश, मराठवाडा (प्रामुख्याने उत्तरेकडील जिल्हे), आणि विदर्भातील काही भागांमध्ये मेघ गर्जनेसह पावसाची स्थिती निर्माण होण्याची शक्यता देखील वर्तविण्यात आली आहे. या भागातील शेतकऱ्यांनी या पुढील कृषी सल्ला आणि हवामानाच्या अंदाजांकडे लक्ष ठेवावे आणि त्यानुसार नियोजन करावे, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात येत आहे.

वादळी पावसासह गारपीटीची शक्यता

हवामान विभागाच्या माहितीनुसार, बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा सक्रीय पट्टा तयार झाला आहे आणि अरबी समुद्रात आर्दता वाढली आहे. यामुळे राज्यात मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात वादळी वाऱ्यांसह पावसाची शक्यता आहे.याबरोबरच, राज्यातील किमान तापमानात वाढ झाली आहे. कडाक्याची थंडी कमी झाली असून, पुढील काही दिवसांत किमान तापमानात २-४ अंश सेल्सियसने वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे वर्षाची सांगता वादळी पावसानं होणार असल्याचं हवामान खात्याच्या अंदाजावरून दिसत आहे.

शेतकऱ्यांनी हवामानाच्या ताज्या अंदाजावर लक्ष ठेवून आवश्यक सावधगिरी बाळगावी आणि तयारी ठेवावी, अशी सूचना कृषी विभागाने केली आहे. शेतकऱ्यांना कृषी विभागाने या स्थितीची तात्काळ दखल घेऊन आवश्यक उपाययोजना करण्याचे आवाहन केले आहे. पाऊस आणि गारपीट यामुळे शेतीला मोठा धोका होऊ शकतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी पिकांची संरक्षण व्यवस्था, गारपीट प्रतिकारक उपाय, तसेच पिकांची योग्य काळजी घेणे महत्त्वाचे आहे. कृषी विभागाने शेतकऱ्यांना हवामानाच्या अंदाजाचे पालन करून पुढील नियोजन करण्याचे सुचवले आहे.

## फळमाशी रोखा, फळबाग वाचवा

फळबाग लागवड महाराष्ट्रा मध्ये मोठ्या प्रमाणावर असून शेतीमध्ये येणारी तरुण पिढी आता फळबाग लागवडीला प्राधान्य देताना दिसत आहे. फळबाग लागवडीतून आर्थिक उत्पन्नाचा शाश्वत मार्ग सापडला आहे, असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. परंतु फळबागांच्या माध्यमातून चांगले उत्पन्न हवे असेल तर सर्व बाजूंनी व्यवस्थापन व्यवस्थित असणे गरजेचे आहे.यामध्ये कीड व्यवस्थापनाला खूप मोठे महत्त्व असून फळबागावर होणारा किडींचा प्रादुर्भाव विविध उपाययोजना करून नियंत्रणात आणणे गरजेचे आहे. या दृष्टिकोनातून आपण फळबागांमध्ये सर्वात जास्त नुकसान करणारी फळमाशी या कीटकाच्या एकात्मिक व्यवस्थापन कोणत्या पद्धतीने करावे याबद्दल माहिती घेणार आहोत.

फळमाशी फळबागांचा कर्दनकाळ

या माशीचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे फळमाशीची एक मादी संपूर्ण जीवन काळात फळाच्या सालीखाली ५०० ते १००० अंडीपुंजके देते. त्यामधून चार ते पाच दिवसात किंवा सात दिवसात अळ्या बाहेर पडतात. या बाहेर पडलेल्या अळ्या फळांच्या गरावर उपजीविका करतात व फळे कुजवतात. या अळीच्या प्रादुर्भावामुळे फळांना अकाली पक्वता येते तसेच फळांमध्ये अळ्या पडतात असे फळे वेडीवाकडी होतात व फळगळ होते.

फळमाशीचे एकात्मिक कीड व्यवस्थापन

१- जमिनीची नांगरट करून जमीन



चांगली तापू देणे गरजेचे असून त्यामुळे या अळीचे कोश उष्णतेत नष्ट होतात. २-मशागत करताना जमिनीमध्ये शिफारस केल्यानुसार कीडनाशक मीसळणे गरजेचे आहे. ३- शक्यतो फळमाशीला प्रतिकारक असणाऱ्या जातींची लागवड करणे गरजेचे आहे.

४- फळमाशी ग्रस्त बागेत पडलेली फळे गोळा करून ती नष्ट करून टाकावी किंवा लांब नेऊन त्यांचा नायनाट करावा. ५- बागेमध्ये मिथिल युजेनॉलचे सापळे एका हेक्टरसाठी पाच किंवा दहा लावावे व त्यामधील कीटकनाशक १५ ते २० दिवसांनी बदलणे गरजेचे आहे. ६- फळधारणा जेव्हा होईल तेव्हा पाच टक्के निंबोळी अर्क किंवा अझाडिरेक्टरीन (१००० पीपीएम) १० मिली प्रति १० लिटर पाणी याप्रमाणे फवारणी करावी. त्यासोबतच तज्ञांच्या सल्ल्याने आर्थिक नुकसानीची पूर्वसंकेत पातळी पाहून शिफारशीप्रमाणे तज्ज्ञांच्या सल्ल्याने औषधांची फवारणी घेणे गरजेचे आहे.

## पालकाच्या या जाती देतात भरघोस नफा

शेतकरी चांगला नफा मिळविण्यासाठी पालकाची लागवड करू शकतात. पालकाचे बरेच प्रकार आहेत. भारतात पालकाची लागवड रब्बी, खरीप आणि उन्हाळी या तीनही पीक हंगामामध्ये केली जाते. यासाठी शेतात पाण्याचा निचरा करण्याची चांगली व्यवस्था असावी. तसेच हलक्या चिकणमाती जमिनीत पालकाच्या पानांचे चांगले उत्पादन मिळते.

या गोष्टींकडे विशेष लक्ष द्या

पेरणीपूर्वी बियाण्यास २ ग्रॅम कॅप्टन प्रति किलोग्रॅमची प्रक्रिया करावी, जेणेकरून उत्पादन चांगले मिळेल. पेरणीसाठी ओळीपासून ओळीपर्यंत २५-३० सेंमी आणि रोपापासून रोपापर्यंत ७-१० सेमी अंतर ठेवावे. पालक लागवडीसाठी, हवामान आणि मातीनुसार जास्त उत्पादन देणारे सुधारित वाण निवडू शकतात.

देशी पालक : देशी पालक बाजारात चांगल्या दराने विकला जातो. देशी पालकाची पाने लहान, गुळगुळीत आणि अंडाकृती असतात. ते खूप लवकर तयार होते, म्हणून बहुतांश शेतकरी त्याची लागवड करतात.

विलायती पालक : परदेशी पालकाच्या बिया गोल आणि काटेरी असतात. डोंगराळ आणि थंड ठिकाणी काटेरी बियाणे वाढवणे अधिक फायदेशीर आहे. मैदानी भागातही गोल जातींची लागवड केली जाते.

ऑल ग्रीन : हिरव्या पालेभाज्या पालकाची जात १५ ते २० दिवसांत तयार होते. एकदा पेरणी केल्यानंतर ते सहा ते सात वेळा पाने कापू शकते. ही वाण निःसंशयपणे जास्त उत्पादन देते, परंतु हिवाळ्यात लागवड केल्यास ७० दिवसांत बियाणे आणि पाने तयार होतात.

पुसा हरित : वर्षभराचा खप भागवण्यासाठी अनेक शेतकरी पुसा हरितची लागवड करतात. त्याची वाढ सरळ वरच्या बाजूस असते आणि त्याची पाने गडद हिरवी आणि आकाराने मोठी असतात. क्षारयुक्त जमिनीवर त्याची लागवड करण्याचे अनेक फायदे आहेत.



## बारमाही खरबूज शेतीचे तंत्र

विविध पिकांची लागवड आणि लागवडीकरिता वापरण्यात येणारे तंत्रज्ञान यांची योग्य सांगड घातल्यामुळे उत्पादनामध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झाल्याचे दिसून येते. यामध्ये संरक्षित शेतीचा विचार केला तर शेडनेट आणि पॉलिहाऊस तंत्रज्ञान खूप महत्त्वाचे आहे. पॉलिहाऊस तंत्रज्ञान पाहिले तर यामध्ये नियंत्रित तापमानाचा वापर करून वर्षभर विविध पिकांची लागवड आपण करू शकतो व भरपूर उत्पादन मिळवू शकतो. तसेच कीड व रोग यापासून देखील प्रभावी संरक्षण आपल्याला करता येते.या सगळ्या दृष्टिकोनातून पॉलिहाऊस तंत्रज्ञान हे पीक लागवडीसाठी खूप महत्त्वाचे आहे. याच पॉलिहाऊस तंत्रज्ञानाचा वापर करून महात्मा फुले कृषी विद्यापीठाने पुसासरबती, हरा मधु व दुर्गापुरा मधू या खरबूज पिकाच्या वानांची लागवड करण्याची शिफारस केली आहे. या माध्यमातून खरबूज पीक वर्षभर लावता येऊ शकते व उत्पादन मिळवता येऊ शकते.

पॉलीहाऊस मधील लागवडीची पद्धत

पॉलिहाऊस मध्ये जर खरबूज लागवड करायची असेल तर माधुरी दोन आणि मधुमती यासारख्या वानांची शिफारस केली असून याकरिता पॉलिहाऊस मध्ये उंच गादीवाफे तयार करून खरबूज लागवड करणे गरजेचे आहे. गादीवाफे तयार करताना त्यामध्ये चार फुटाचे आणि दोन रोपातील अंतर दीड फूट ठेवणे गरजेचे असून वाफ्याची उंची ही साधारणपणे दीड फूट व रुंदी दोन फूट असणे गरजेचे आहे. दहागुंठ्याचे पॉलिहाऊस असेल तर या क्षेत्रामध्ये साधारणपणे रोपांची संख्या २४०० पर्यंत असणे गरजेचे आहे.



भरघोस उत्पादनासाठी या गोष्टींची घ्या काळजी

खरबूज लागवड केल्यानंतर जेव्हा मुख्य वेल असते तिला आजूबाजूला येणाऱ्या फांद्या असतात ते वेळोवेळी काढणे गरजेचे आहे. वेलीला पहिले जे काही सात किंवा दहा पाने येतात त्यानंतर पहिल्या फळांची फळधारणा करून घ्यावी. परागीभवनाची योग्य वेळ सकाळी ९ ते ११ व सायंकाळी चार ते सहा या कालावधीत करावी. वेलीवर एका वेळी शक्य असेल तर एकच फळ ठेवणे गरजेचे आहे. परागीभवन करत असताना आद्रता ८० टक्के असणे गरजेचे असून परागीभवन झाल्यानंतर ५० ते ५५ दिवसांमध्ये खरबूज काढणीस तयार होते. काढणी करण्यासाठी रिफ्रॅक्टमीटर च्या साह्याने फळातील साखरेचे प्रमाण तपासून घ्यावी व १४ ते १५ ब्रिक्स झाला तेव्हा त्याचे काढणी करावी. या पद्धतीने जर व्यवस्थापन कराल तर दीड ते दोन किलोपर्यंत फळाचे उत्पादन मिळू शकते.

पाणी व्यवस्थापनाची पद्धत : या पिकाला पाण्याची व्यवस्थापन करताना खूप काळजी घ्यावी लागते. या पिकाला जास्त पाणी चालत नसल्यामुळे ठिबक सिंचन पद्धतीचा वापर हा महत्त्वाचा ठरतो. ठिबक संचाची निवड करताना चार लिटर प्रतितास क्षमता असणारी ड्रीप लाइन याकरिता निवडणे गरजेचे आहे. वातावरण तर ढगाळ असेल तर खूप कमी पाणी लागते. परंतु फळधारणा आणि फळ फुगवणीच्या वेळेमध्ये खूप पाण्याची आवश्यकता असते. साधारणपणे दोन ते तीन लिटर पाणी प्रती झाड प्रत्येक दिवशी असे नियोजन करणे गरजेचे आहे.

अशाप्रकारे करा खत व्यवस्थापन

खरबूज पिकाला खत व्यवस्थापन करताना नत्राची मात्रा लागवड करताना आणि आणि वाढीच्या अवस्थेमध्ये द्यावे. फॉस्फरसच्या पुरवठ्याकरिता सिंगल सुपर फॉस्फेट या खताचा वापर करावा तसेच पिकाच्या वाढीच्या सुरुवातीच्या कालावधीत पोटॅश हा घटक देखील महत्त्वाचा ठरतो. या पद्धतीने खतांचे नियोजन करावे. या मुख्य खतांसोबतच मायक्रो न्यूट्रिएंट आणि सूक्ष्म अन्नद्रव्ये यांचा देखील संतुलित वापर करणे खूप गरजेचे आहे. बऱ्याचदा खरबूज फळाला छेद जातात. ही समस्या येऊ नये म्हणून अगदी सुरुवातीपासून कॅल्शियम व बोरॉन या अन्नद्रव्यांचा संतुलित वापर करावा.

काढणी केल्यानंतर व्यवस्थापन : खरबूज पिक काढणीस तयार होते तेव्हा काढणी झाल्यानंतर कोरोगेटेड बॉक्स मध्ये फोमनेटचा वापर करून फळे पॅकिंग करावीत व विक्रीसाठी पाठवावीत. प्रतिवेल दीड किलोपर्यंत फळे मिळतात.

पॉलिहाऊस मधील खरबूज लागवडीचे प्रशिक्षण कुठे मिळेल?

या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून पॉलिहाऊस मधील खरबूज लागवड हे प्रामुख्याने कृषी विज्ञान केंद्र बारामती या ठिकाणी केली जाते. या ठिकाणी शेतकऱ्यांसाठी प्रशिक्षणाची देखील सोय करण्यात आली आहे.

## दिन विशेष

### जागतिक दिवस: खिसमस डे ,राष्ट्रीय सुशासन दिवस

### महत्वाच्या घटना

१७७१ : मुघल प्रशासक दुसरा शाह आलम दिल्लीच्या सिंहासनावर बसले.
१७६३ : भरतपूर चे महाराजा सुरजमल यांची हत्या.
१९४६ : ताईवान ने संविधानाला स्वीकारले.
१९७४ : रोम जात असेलेले एअर इंडिया चे बोईंग ७४७ चे अपहरण.
१९७६ : 'आय. एन. एस. विजयदुर्ग' ही युद्धनौका भारतीय नौदलात सामील
१९९० : वर्ल्ड वाइड वेबची पहिली यशस्वी चाचणी
१९९१ : मिखाईल गोर्बाचेव्ह यांनी सोविएत संघराज्याच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. याच्या दुसऱ्याच दिवशी सोविएत संघराज्याचे विघटन करण्यात आले आणि जनमत चाचपणीच्या आधारे सर्वप्रथम युक्रेन हा देश सोव्हिएत संघराज्यातुन बाहेर पडला.
२००२ : चीन आणि बांगलादेश मध्ये संरक्षण करार पार पडला.
२००५ : ४०० वर्षाआधी लुप्त झालेला पक्षी "डोडो" चे दोन ते तीन हजार वर्ष जुने अवशेष आढळले.
२००८ : भारताने पाठविलेल्या चंद्रयान-१ च्या पेलोडर ने चंद्राचा पहिला नवीन फोटो पाठविला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६४२ : सर आयझॅक न्यूटन इंग्लिश भौतिकशास्त्रज्ञ, गणितज्ञ व खगोलशास्त्रज्ञ. गुरुत्वाकर्षणाचा सिद्धांत मांडला. गणितातील 'कॅल्क्युलस' या शाखेचे जनक (मृत्यू: २० मार्च १७२७)
१८२१ : अमेरिकन रेड क्रॉसच्या संस्थापिका क्लारा बार्टन यांचा जन्म. (मृत्यू: १२ एप्रिल १९१२)
१८६१ : पण्डित मदन मोहन मालवीय बनारस हिन्दू विश्वविद्यालयाचे एक संस्थापक (मृत्यू: १२ नोव्हेंबर १९४६)
१८७२ : संस्कृत भाषेचे विद्वान पंडित गंगानाथ झा यांचा जन्म.
१८७६ : बॅ. मुहम्मद अली जिना पाकिस्तानचे प्रणेते व पहिले गव्हर्नर जनरल (मृत्यू: ११ सप्टेंबर १९४८)
१८७८ : शेवरले कंपनीचे सहसंस्थापक लुई शेवरोलेट यांचा जन्म. (मृत्यू: ६ जून १९४१)
१८८६ : पाकिस्तानचे प्रणेते व पहिले गव्हर्नर जनरल बॅ. मुहम्मद अली जिना यांचा जन्म. (मृत्यू: ११ सप्टेंबर १९४८)
१८८९ : रीडर डायजेस्टच्या सहसंस्थापिका लीला बेल वॉलेस यांचा जन्म. (मृत्यू: ८ मे १९८४)
१९११ : बर्न होगार्थ जंगलचा सम्राट टारझन याला कार्टुनद्वारे अजरामर करणारे अमेरिकन व्यंगचित्रकार, लेखक, शिक्षणतज्ञ (मृत्यू: २८ जानेवारी १९९६ पॅरिस, फ्रान्स)
१९१६ : अल्जेरियाचे पहिले अध्यक्ष अहमद बेन बेला यांचा जन्म. (मृत्यू: ११ एप्रिल २०१२)
१९१८ : अन्वर सादात इजिप्तचे राष्ट्राध्यक्ष व नोबेल पारितोषिक विजेते (मृत्यू: ६ आक्टोबर १९८१)
१९१९ : नौशाद अली संगीतकार (मृत्यू: ५ मे २००६)
१९२१ : भारतीय-पाकिस्तानी पत्रकार आणि लेखक झैब-अन-नसीसा हमिदुल्ला यांचा जन्म. (मृत्यू: १० सप्टेंबर २०००)
१९२४ : अटलबिहारी बाजपेयी भारताचे १० वे पंतप्रधान, भारतीय जनता पक्षाचे नेते, असामान्य संसदपटू, अलौकिक वक्ते व उत्तुंग प्रतिभेचे ओजस्वी कवी, पद्मविभूषण
१९२५ : प्रसिद्ध चित्रकार सतीश गुजराल यांचा जन्म.
१९२६ : चित्त बसू संसदपटू, 'फॉरवर्ड ब्लॉक'चे सरचिटणीस (मृत्यू: ५ आक्टोबर १९९७)
१९२६ : डॉ. धर्मवीर भारती हिन्दी लेखक, कवी, नाटककार, पत्रकार व 'धर्मयुग' साप्ताहिकाचे २७ वर्षे संपादक, 'अभ्युदय' व 'संगम' या नियतकालिकांचे संपादनही त्यांनी केले. (मृत्यू: ४ सप्टेंबर १९९७)
१९२७ : पं. रामनारायण सुप्रसिद्ध सारंगीये
१९३२ : प्रभाकर जोग व्हायोलिनवादक, संगीत संयोजक व संगीतकार
१९३६ : भारतीय-इंग्रजी दिग्दर्शक व निर्माते इस्माईल मर्चंट यांचा जन्म. (मृत्यू: २५ मे २००५)
१९४९ : नवाझ शरीफ पाकिस्तानचे १२ वे पंतप्रधान
१९५९ : भारतीय कवी आणि राजकारणी रामदास आठवले यांचा जन्म.
१९८० : राष्ट्रवादी मुस्लीम नेते मुख्तार अहमद अंसारी यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९४९ : वॉर्नर ब्रदर्स कार्टूनचे संस्थापक लिओन स्चलिंगर यांचे निधन. (जन्म: २० मे १८८४)
१९५७ : प्रा. श्रीपाद महादेव तथा श्री. म. माटे साहित्यिक, विचारवंत व अस्पृश्यता निवारणासाठी सतत प्रयत्न करणारे कृतिशील समाजसुधारक. १९१६ मध्ये त्यांनी दलितांसाठी रात्रशाळा काढली व वीस पंचवीस वर्षे मोफत शिकवले. (जन्म: २ सप्टेंबर १८८६)
१९७२ : चक्रवर्ती राजगोपालाचारी भारताचे शेवटचे गव्हर्नर जनरल, मद्रास इलाख्याचे मुख्यमंत्री, स्वातंत्र्यसेनानी, कायदेपंडित, मुत्सद्दी आणि लेखक (जन्म: १० डिसेंबर १८७८)
१९७७ : चार्ली चॅपलिन अभिनेता, दिग्दर्शक आणि संगीतकार. त्यांच्या 'लाईम लाईट' या चित्रपटाला ऑस्कर पारितोषिक मिळाले होते. 'कीड ऑटो रेसेस ॲट व्हेनिस' या त्यांच्या दुसर्या चित्रपटातील डर्बी हॅट, घट्ट कोट ढगळ पँट, चौकोनी मिशा, बेढब जोडे आणि काठी या वेशभूषेमुळे चार्ली चॅप्लिन म्हणजे लोकांना मूर्तिमंत विनोद वाटू लागले. (जन्म: १६ एप्रिल १८८९)
१९८९ : रोमेनियाचे पहिले अध्यक्ष निकोला सीउसेस्कु यांचे निधन. (जन्म: २६ जानेवारी १९१८)
१९९४ : ग्यानी झैलसिंग भारताचे ७ वे राष्ट्रपती, पंजाबचे मुख्यमंत्री, केंद्रीय गृहमंत्री (जन्म: ५ मे १९१६)
१९९५ : डीन मार्टिन अमेरिकन गायक, संगीतकार व निर्माते (जन्म: ७ जून १९१७)
१९९८ : दत्तात्रय गोविंद तथा दत्ता खेबुडकर नाटककार व दिग्दर्शक
२०१५ : भारतीय अभिनेत्री साधना शिवदासानी यांचे निधन.

# महापुरुषांचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन शिक्षकांनी विचारप्रवर्तक बोलले पाहिजे-प्रा.डॉ.लुलेकर

## नालंदा फाउंडेशनच्या बीडच्या वतीने शिक्षकांची राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा

बीड। प्रतिनिधी

वक्तृत्व हे आपलं म्हणणं काय आहे हे स्पष्ट मांडता आलं पाहिजे, समूहाचं म्हणणं मांडता आलं पाहिजे. बाबासाहेब म्हणाले होते की, ''शंभर चौथी पास पेक्षा एक ग्रॅज्युएट मला पाहिजे जो समाजाचं म्हणणं मांडेल. आता सगळेच ग्रॅज्युएट झालेत पण त्यांना समाजाचं म्हणणं मांडता येत नाही हे दुर्दैव आहे. तुमचं म्हणणं नीटपणे मांडता येणं, तशी भाषा कमावणं याला फार महत्व आहे, म्हणून विचारप्रवर्तक तुम्ही किती बोलता आणि तुमच्या विचाराची स्पष्टता किती आहे याला महत्व असल्याचे प्रतिपादन प्रसिद्ध विचारवंत प्रा.डॉ. प्रल्हाद लुलेकर यांनी केले. तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, बीड येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या (७ नोव्हेंबर) शाळा प्रवेश दिनानिमित्त नालंदा फाउंडेशन बीडच्या वतीने आयोजित शिक्षकांची राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा २०२४ उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नालंदा फाउंडेशन चे अध्यक्ष प्रा.प्रदीप रोडे उपस्थित होते तर विचार मंचावरती प्रसिद्ध विचारवंत प्रा.डॉ. प्रल्हाद लुलेकर, प्रोफेसर.डॉ. सुधाकर शेंडगे, प्रा.डॉ.यशपाल खेडकर, प्राचार्य डॉ.शामसुंदर वाघमारे आदींची प्रमुख उपस्थिती होती.




प्रथम पारितोषिक पाटील प्रेमनाथ शामा (बाळाराम परशुराम पाटील कनिष्ठ महाविद्यालय, रोहिंजन, ता. पनवेल, जि. रायगड.) यांना रोख रक्कम रूपये २५०००/- स्मुर्तिचिन्ह, सन्मानपत्र व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले, द्वितीय पारितोषिक मस्के तुकाराम नारायण ( विवेक वर्धनी महाविद्यालय, पंढरपूर.) यांना रोख रूपये १५०००/- स्मुर्तिचिन्ह, सन्मानपत्र व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले, तृतीय पारितोषिक जाधव श्रीराम बापूराव ( कृषी पंडित भागुजीराव ढेकळे महाविद्यालय, पाडळशिंगी, ता. गेवराई जि. बीड.) यांना रोख रक्कम रूपये १००००/- स्मुर्तिचिन्ह, सन्मानपत्र व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले तर उत्तेजनार्थ पारितोषिक पांचाळ शीतल कृष्णा ( डॉ. देसारडा पब्लिक स्कूल, छत्रपती संभाजीनगर.) यांना रोख रक्कम रुपये ५०००/- सन्मानपत्र , पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. स्पर्धेसाठी महाराष्ट्रातील सांगली, सातारा, पुणे, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, मुखेड, नांदेड, कोल्हापूर, पंढरपूर, सोलापूर, लातूर, बीड, जालना, धाराशिव, परभणी, भंडारा, धुळे,जळगाव, रायगड आदी जिल्ह्यांतून अनेक विद्यार्थी स्पर्धक म्हणून सहभागी झाले होते.परीक्षक म्हणून प्रोफेसर डॉ. सुधाकर शेंडगे (हिंदी विभाग प्रमुख, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ.संभाजीनगर.), प्रा.डॉ.यशपाल खेडकर (विभाग प्रमुख, स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पंढरपूर,) व प्राचार्य, डॉ.शामसुंदर वाघमारे (शारदा महाविद्यालय, परभणी.) यांनी स्पर्धेचे परीक्षण केले. याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाचे सहसंयोजक, प्रा. राम गायकवाड यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा. अंकुश कोरडे यांनी केले.

यावेळी कार्यक्रमास सहसंयोजक, प्रा.शरद वंजारे, प्रा.अर्जुन राठोड, इंजिनीयर दिपांकर रोडे, प्राचार्य अशोक धुलधुले, उपप्राचार्य डी.जी. निकाळजे यांचेसह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, शिक्षक स्पर्धक, रसिक श्रोतेंसह आदी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेबाबत बबन पांचाळ, संजय सरडे, फारुकी नुमान, विशाल रोडे, रोहित जोगदंड, सोमनाथ लोंढे, बन्सी ससाने, विजय नागरगोजे सह आदी कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# लिंबागणेश जिल्हा परिषद शाळेत शैक्षणिक साहित्य वाटप



लिंबागणेश। प्रतिनिधी

बीड तालुक्यातील मौजे लिंबागणेश येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत युवा ग्रामीण पत्रकार संघाचे बीड जिल्हाध्यक्ष हरिओम क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त आज दि.२४ मंगळवार रोजी विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक आबासाहेब हांगे तर प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र ग्रामीण बकेचे मॅनेजर अविनाश सोनवणे व सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे उपस्थित होते.

यावेळी सहशिक्षक भरत चौरे,संदिपान आगम, माधुरी कुलकर्णी, सुवर्णा अयाचित , बँक कर्मचारी समाधान ढास उपस्थित होते. सुत्रसंचलन भरत चौरे यांनी केले तर वाढदिवसाच्या निमित्ताने मनोगत व्यक्त करताना पत्रकार हरीओम क्षीरसागर यांनी याच शाळेचा विद्यार्थी असल्याने याच शाळेत सामाजिक भान ठेवून मुलांसाठी खारीचा वाटा उचलण्याचा योग आला त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

आजकाल वाढदिवस म्हटलं की बॅनरबाजी,केक ,हार,तुरे, पार्टी अशा प्रकारच्या अनावश्यक खर्चाला फाटा देऊन ग्रामीण भागातील शालेय विद्यार्थ्यांना उपयोगी शालेय साहित्य वाटपाचा वाढदिवसाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते हरिओम क्षीरसागर यांचा अभिनव उपक्रम खरोखरच कौतुकास्पद असल्याचे मुख्याध्यापक आबासाहेब हांगे यांनी मनोगत व्यक्त केले.

## थोडक्यात

### संस्कार विद्यालय मध्ये गणित व क्रीडा उत्सव

बीड। प्रतिनिधी

संस्कार विद्यालयाच्या माध्यमातून विभागांतर्गत अत्यंत हर्ष उल्हासामध्ये संस्कार वार्षिक स्नेहसंमेलन निमित्त क्रीडा उत्सव तथा श्री श्रीनिवास रामानुजन यांच्या जन्मदिनानिमित्त गणित उत्सवाच्या श्रीगणेशा करण्यात आला . आरंभी संस्कार विद्यालयाचे मुख्याध्यापक सतीश गंधेसर यांनी थोर भारतीय गणितज्ञ श्री श्रीनिवास रामानुजन यांच्या प्रतिमेचे माल्यार्पणाने पूजन केले . याप्रसंगी संस्कार गणित विषय समितीचे प्रमुख गणित तज्ञ विनायक जोशी रघुनाथ तावरे आनंद मोरे श्रीमती कुलकर्णी एस एस तसेच क्रीडा शिक्षक रामदास भोसले बापू भोसले यांचे विशेष उपस्थिती होती .विनायक जोशी यांनी याप्रसंगी श्रीनिवास रामानुजन यांच्या जीवन कार्याचा वेध घेतला व विद्यार्थ्यांना त्यांच्या जीवनातील मौलिक प्रसंग विशद करून सांगितले .भारतीय गणितज्ञ रामानुजन यांच्या स्वलिखित गणितांच्या वह्यांवर परदेशामध्ये परदेशी लोक गणितामध्ये संशोधन करत आहेत हा आपल्या भारतीयांचा गौरव आहे असे प्रशंसनीय उद्गार श्री विनायक जोशी यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले .तसेच विविध भारतीय गणित तज्ञांची ओळख ही या प्रसंगी त्यांनी विद्यार्थ्यांना करून दिली . रघुनाथ तावरेसर यांनी गणित विषयावर आधारित सामान्य ज्ञान स्पर्धा घेतली व विद्यार्थ्यांशी संवाद साधला व विद्यार्थ्यांची परीक्षा घेतली. क्रीडा शिक्षक बापू भोसले यांनी या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन केले .

### माजलगाव विकास प्रतिष्ठानची सहल

माजलगाव। प्रतिनिधी

येथील माजलगाव विकास प्रतिष्ठानतर्फे आयोजित शैक्षणिक सहल दिनांक २१ व २२ डिसेंबर २०२४ रोजी यशस्वीरीत्या संपन्न झाली. सादोळा, रोड केसापुरी कॅम्प अंतर्गत माजलगाव, वडवणी व धारूर तालुक्यातील इयत्ता ७ वी व ८ वी च्या विद्यार्थ्यांसाठी या सहलीचे आयोजन करण्यात आले होते. सहलीदरम्यान विद्यार्थ्यांनी बीड येथील गोरक्षनाथ टेकडी, कंकालेश्वर मंदिर आणि खंडेश्वरी मंदिराला भेट दिली. पाली येथील इन्फंट इंडिया या संस्थेस भेट देताना संस्थेचे संस्थापक बारगजे सर यांनी विद्यार्थ्यांना तेथील विविध उपक्रमांची माहिती दिली. हस्तकला व्यवसाय, रंगकाम, दैनंदिन उपक्रम, ग्रंथालय आणि वृक्षारोपण या उपक्रमांची सविस्तर माहिती देण्यात आली.सहलीचा विशेष आकर्षणाचा भाग म्हणजे श्री क्षेत्र कपिलधार येथील भेट होती. येथील भव्य धबधबा, निसर्गरम्य वातावरण, हिरवीगार झाडे, पशु-पक्षांचा किलबिलाट आणि विस्तीर्ण अभयारण्याचा आनंद विद्यार्थ्यांनी मनसोक्त लुटला.माजलगाव विकास प्रतिष्ठानच्या माध्यमातून गेल्या २० वर्षांपासून अनाथ मुलांसाठी विविध उपक्रम राबवले जात असून, सध्या ३५० हून अधिक विद्यार्थी या संस्थेचे लाभार्थी आहेत. शैक्षणिक साहित्य वाटप, गुणवंत विद्यार्थी सत्कार, किशोरवयीन मुलींसाठी कार्यशाळा, दिवाळी फराळ वाटप, क्रीडा स्पर्धा आणि सायकल वाटप असे विविध उपक्रम संस्थेमार्फत नियमितपणे राबवले जातात. या यशस्वी सहलीबद्दल आमदार प्रकाश दादा सोळंके, प्रतिष्ठानच्या अध्यक्षा मंगलाताई सोळंके आणि सचिव नीला देशमुख, विरेन सोळंके, पल्लवीताई सोळंके यांनी समाधान व्यक्त केले. सहलीचे यशस्वी आयोजन पुरुषोत्तम सोळंके, संतोष पालकर, रेश्मा सय्यद, शिंदे मॅडम यांनी केले.या सहलीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शैक्षणिक आणि सांस्कृतिक स्थळांची माहिती मिळाली असून त्यांच्या ज्ञानात भर पडली आहे.

# योगेश्वरी कन्या शाळा सुवर्ण महोत्सव सांगता समारंभ २८ डिसेंबर रोजी

अंबाजोगाई। प्रतिनिधी

श्रीमती गोदावरीबाई कुंकूलोळ योगेश्वरी कन्या शाळेचा सुवर्ण महोत्सवी वर्षाचा सांगता समारंभ शनिवार २८ डिसेंबर रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत दोण सत्रात संपन्न होणार आहे.पहिल्या सत्रात सकाळी ८.३० ते ९ शोभायात्रा (स्वामीजी स्मृतिस्थळ ते शाळा परिसर)मुख्य कार्यक्रम सकाळी १० ते दुपारी १२.३० वाजेपर्यंत होणार आहे. कार्यक्रमाचे व योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर तर प्रमुख पाहुणे सुप्रसिद्ध मराठी अभिनेत्री व मराठी शाळांची 'सदिच्छा दूत'चिन्मयी सुमीत उपस्थित आसणार आहेत.

सत्र दुसरे हे ३ ते ६ या वेळेत गुणवंत विद्यार्थीनीचा सत्कार, मुलाखत व आजी माजी विद्यार्थीनीचा सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे.दुसऱ्या सत्राच्या अध्यक्ष प्रा.डॉ जयश्री मोटेगावकर तर प्रमुख अतिथी समनवयक ॲाड कल्याणी विर्धे या आसणार आहेत.स्नेहभोजन दुपारी १२.३० ते २.३० या वेळेत होणार आहे.या दोण्ही सत्रासाठी प्रमुख अतिथी साधना कुंकूलोळ (पुणे),मधुवंती साने (पुणे),डॉ. क्षमा देवशटवार (पुणे), अपेक्षा कसबे (तुळजापूर) यांची उपस्थित राहाणार आहे.

श्रीमती गोदावरीबाई कुंकूलोळ योगेश्वरी कन्या शाळेचा सुवर्ण महोत्सवी वर्षाचा सांगता समारंभ शनिवार २८ डिसेंबर रोजी संपन्न होणार आहे.या कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे अवाहान संस्थेचे उपाध्यक्ष गणपत व्यास, प्रा. भिमाशंकर शेटे,ॲाड जगदीश चौसाळकर,सौ. एम. एस. कुलकर्णी,कमलाकरराव चौसाळकर,सौ. जे. के. चव्हाण,डॉ. शैलेश वैद्य,सौ. एस.एन. धावडकर व श्रीमती गोदावरीबाई कुंकूलोळ योगेश्वरी कन्या शाळा परळी रोड अंबाजोगाई यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# संस्कार विद्यालयामध्ये बालविवाह कायद्याची जनजागृति

बीड। प्रतिनिधी

इसवी सन २००६ मध्ये शासनाने बालविवाह प्रतिबंधक कायदा अंमलात आणला मुलगी १८ व मुलगा २१ वर्षपिक्षा लहान असताना विवाह केल्यास तो बाल विवाह कायद्याचा भंग ठरतो त्यामुळे अशा पद्धतीने विवाह झाल्यास वधू - वर पक्ष मध्यस्त व वऱ्हाडी या सर्वांनाच कायद्यानुसार शिक्षा होऊ शकते, त्यामुळे प्रत्येकाने ग्रामीण व शहरी पातळीवर याविषयी जागृत असणे आवश्यक आहे असे बालविवाह कायदेविषयक मत एपीआय श्रीमती वर्षा वगाडे यांनी व्यक्त केले .त्या संस्कार विद्यालयामध्ये प्रमुख मार्गदर्शक म्हणून मार्गदर्शन करत होत्या . याप्रसंगी संस्कार पिठासनावर पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ दैनिक पार्श्वभूमी चे संपादक गंमत भंडारी दैनिक लोकप्रश्न चे संपादक दिलीप खिस्ती व मुख्याध्यापक सतीश गंधे यांची विशेष उपस्थिती होती .

याप्रसंगी भाष्य करताना श्रीमती वर्षा वगाडे म्हणाल्या मुलगी म्हणजे परक्याचं धन असे समजून ग्रामीण भागातून मुलीचा तात्काळ विवाह करून देण्याकडे पालकांचा कल आहे व ते मुलीला सांभाळण्याच्या जबाबदारीतून मुक्त होण्याचा प्रयत्न करतात .परंतु या वयामध्ये विवाह झाल्यास अनेक समस्या उद्भवू शकतात या संदर्भात त्यांनी विद्यार्थ्यांना जागृत करण्याचा प्रयत्न केला.

शालेय वय म्हणजे मुलींचे दोरीवरचे वय आहे आठवी ते बारावीचे वय घडण्याचा आणि बिघडण्याचं वय आहे त्यामुळे आपण इथे संयमाने वागणे महत्त्वाचे आहे.असेही त्या म्हणाल्या. पोलिसनिरीक्षक शितल कुमार बल्लाळ म्हणाले की, शाळेत मोटरसायकल व मोबाईल आणल्यास ते कायमस्वरूपी जप्त केले जाईल .मोबाईल मध्ये कोणतीही लालूच दाखवून मेसेज आले तर त्याकडे दुर्लक्ष करा अनोळखी लिंक डाऊनलोड करू नका .आपल्या आई-वडिलांना याबाबत जागृत करा असाही मोलाचा सल्ला त्यांनी या प्रसंगी दिला . विद्यार्थ्यांना कोणतीही अडचण आल्यास त्यांनी ७५ ८८ ८० ७७ ७४ या क्रमांकावर कोणत्याही वेळेत संपर्क करावा असे आवाहन केले.

याच वेळी दैनिक पार्श्वभूमी चे संपादक गंमत भाऊ यांचेही समयोचित भाषण झाले व त्यांनी नवी भाजी मंडईतील विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या रस्ता अतिक्रमण व रोडरोमिओ विषयांवर समस्या शहर पोलीस निरीक्षकांसमोर मांडल्या तसेच मुली लवकर वयात येत आहेत त्यामुळे विवाहाचे १८ वर्ष वय याविषयी सुद्धा पुनर्विचार होण्याची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन केले. सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्री शिवाजी परळकर यांनी केले .यावेळी इयत्ता आठवी ते दहावी मधील विद्यार्थी, शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# एड्स वर नियंत्रण ठेवण्यासाठी युवकांनी व्यसनमुक्तीचा मार्ग स्वीकारावा-डॉ.कुलकर्णी

पाटोदा। प्रतिनिधी

पाटोदा येथील जय भवानी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने व बीड जिल्हा एड्स नियंत्रण कक्ष बीड शासकीय रुग्णालय बीड यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक एड्स दिनानिमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले एड्स प्रतिबंध आणि युवक या विषयावर डॉ सुहास कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य सोमनाथ घाडगे हे उपस्थित होते.

प्रमुख पाहुणे म्हणून नेकनूर येथील रुग्णालयाच्या श्रीमती शारदा गोरे मॅडम उपस्थित होत्या व प्राध्यापक कल्पना घारगे कार्यक्रमाधिकारी डॉ शिवाजीराव काकडे व्यासपीठावर उपस्थित होते सुरुवातीला मान्यवरांचा सत्कार करून या कार्यक्रमाचे सुरुवात करण्यात आली या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ शिवाजीराव काकडे यांनी केले डॉ सुहास कुलकर्णी यांनी




आपले मनोगत व्यक्त करताना एड्स प्रतिबंध आणि युवक या विषयावर आपले व्याख्यान दिले युवकांनी एड्सचा प्रतिबंध करण्यासाठी व्यसनमुक्तीचा मार्ग स्वीकारण्याचे आव्हान केले तर प्रमुख पाहुण्या श्रीमती गोरे मॅडम यांनी एड्सची प्राथमिक लक्षणे यावर सविस्तर मनोगत व्यक्त केले कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा सोमनाथ घाडगे यांनी आपल्या काव्याच्या माध्यमातून यश जनजागृतीवर कविता सादर केली व युवकांनी चांगले जीवन घडवण्यासाठी सुदृढ आरोग्यासाठी चांगला आहार व्यायाम इत्यादीचा मार्ग स्वीकारण्याचे आवाहन केले. विशाल खामकर विशाल निंबाळकर यांनी मनोगत व्यक्त केले या कार्यक्रमाचे संचालन कार्यक्रमाधिकारी डॉक्टर लोखंडी बीबी यांनी केले तर आभार कुमारी आकांक्षा मग काळ हिने मानले कार्यक्रमात विद्यार्थी विद्यार्थी प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रमानंतर विविध स्पर्धेत सहभागी घेतलेले स्पर्धकांना प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला

# हसन मुश्रीफ मंत्री झाल्याने आनंदोत्सव

## राजू इनामदारांनी वाटले शैक्षणिक साहित्य

बीड/प्रतिनिधी

राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून हसन मुश्रीफ यांची मंत्री म्हणून निवड झाली आहे. खरंतर राज्याच्या राजकारणात प्रदिर्घ काळ सत्तेत असलेल्या व्यक्तींपैकी हसन मुश्रीफ एक आहेत.त्यामुळे सामाजिक कार्यकर्ते राजू इनामदार यांनी या निवडीबद्दल शालेय साहित्य वाटप करुन आनंदोत्सव साजरा केला आहे. बीड शहरातील,काजी नगर येथील आझाद हिंद सेमी इंग्लिश स्कुलमध्ये मंगळवार (ता.२३) डिसेंबर रोजी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्रमुख उपस्थितीत ॲड.राजेश शिंदे, सुनिल डोंगरे,संगमेश्वर आंधळकर,मल्हारी जाधव,अरविंद जाधव,शाळेचे सचिव मुसा शेख उपस्थित होते.

यावेळी ॲड.राजेश म्हणाले की, सामाजिक कार्यकर्ते राजू इनामदार यांनी, राबविलेला उपक्रम दखलपात्र आहे. कारण ज्या नेत्याची आणि आपली भेटही झालेली नाही. त्यांच्या मंत्री होण्याचा हा आनंद साजरा होत असून हा एक विलक्षण क्षण आहे. त्यामुळे राजू इनामदार यांच्यासारखे कार्यकर्ते



क्वचित पहायला मिळतात,असेच म्हणावे लागेल. यावेळी शिंदे असंही म्हणाले की, आझाद हिंद शाळेतील विद्यार्थ्यांनो यशस्वी होऊन सर्वांचेच नाव लौकिक करा. कारण अतिशय खडतर प्रवासातूनच यशाची पायवाट गेलेली असते. अभ्यासातील सातत्य, जिद्द, चिकाटी, आणि प्रत्येकाशी आदरपूर्वकपणे वागायला शिका, असे विचार ॲड.राजेश शिंदे यांनी व्यक्त केले. आझाद हिंद शाळेत आयोजित शैक्षणिक साहित्य वाटपाचा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक सय्यद अवेज अली, शेख मुद्दशीर, शेख फैसर, शेख रजा, सिद्दीकी बशीर यांनी मोलाचे योगदान दिले.

# एका हातात शस्त्र आणि दुसऱ्या हातात शास्त्र असणाऱ्या राष्ट्रमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होत्या. -तुकाराम येवले

माजलगाव। प्रतिनिधी

येथील -श्री सिद्धेश्वर महाविदयालय राष्ट्रभक्त निर्माण करणारे,एक आदर्श नागरिक निर्माण करणारे महाविद्यालय आहे .अहिल्यादेवीचे कार्य अखंड भारतभर होते.एका हातात शत्र आणि एका हातात शास्त्र असणाऱ्या अहिल्यादेवी होत्या. भारतीय विचारात राष्ट्र घडणीचे कार्य करणाऱ्या आदर्श राष्ट्रमाता होत्या.असे प्रतिपादन तुकाराम येवले यांनी केले ते श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जन्म त्रिशताब्दी निमित्ताने अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनावरील चित्रप्रदर्शनी कार्यक्रमात उदघाटक म्हणून बोलत होते.

पुढे बोलताना तुकाराम येवले म्हणाले की या लोकमातेने आदर्श



राज्यकारभार,आणि निःपक्षपाती न्यायवेवस्था यांचा मूलमंत्र दिला. घाट, मंदिरे, धर्मशाळा, अन्नछत्र उभे केले. स्वतःची मुलगी पणाला लावून वीर यशवंत फणसे यांच्याशी आंतरजातीय करून आपल्या राजकारभारातील समस्या सोडविल्या.प्रास्ताविकात प्राचार्य डॉ मुकुंद देवर्षी म्हणाले की,जो इतिहास घडवितो तोच आपल्या कर्तृत्वाने समाजमनावर ठसा उमटवत असतो . पुण्यश्लोक अहिल्यादेवी आधुनिक भारताच्या सांस्कृतिक राष्ट्रवादाच्या प्रणेत्या होत्या.त्यांचे कार्य भारतीय इतिहासात सोनेरी पान आहे.पुढे प्राचार्य देवर्षी म्हणाले की,अहिल्यादेवींनी सतीप्रथा बंद केली.आदर्श राज्यकारभार,मंदिरे घाट बांधले. अध्यक्षीय समारोप प्रसंगी ॲड.विश्वास जोशी म्हणाले की चारित्र्य,व्यक्तिमत्व विकास घडविण्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांचा इतिहास महत्वपूर्ण आहे.इतिहासात मोठी क्रांती अहिल्यादेवींनी केली.आपल्या कर्तृत्वाने पुण्यश्लोक झाली.प्रचंड दुःख पचवून अखंड राष्ट्रासाठीचे कार्य अहिल्यादेवीचे महान होते.यावेळी व्यासपीठावर श्री सिद्धेश्वर संकुलाचे पालक व अहिल्यादेवी होळकर त्रिजन्मशताब्दी संयोजन समिती केंद्रीय उपाध्यक्ष प्रकाश दुगड, भाशिप्र संस्था केंद्र कार्यकारिणी सदस्य अमरनाथ खुर्पे,महाविद्यालय विकास समिती अध्यक्ष अभय कोकड, प्रा.लक्ष्मीकांत सोन्नर यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन डॉ कमलकिशोर लड्डा तर आभार उपप्राचार्य डॉ.गजानन होन्ना यांनी केले.शांतिमंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी उपप्राचार्य डॉ,गजानन होन्ना,प्रा.अंकुश साबळे प्राध्यापक, विध्यार्थी उपस्थित होते.गावातील छत्रपती शिवाजी विद्यालय,जिल्हा परिषद कन्या प्रशाला,श्री सिद्धेश्वर विद्यालय, राजस्थानी विद्यालय येथील असंख्य विदयार्थी, शिक्षक हे चित्र प्रदर्शनी पाहण्यासाठी आले होते.

# धनंजय मुंडे आधी असे नव्हते

## मस्साजोग सरपंच हत्येवर आ.सुरेश धस यांची टीका



पाटोदा । प्रतिनिधी

**माझ्या बूथ प्रमुखाची हत्या झाली. संतोष देशमुख हा भाजपचा बूथ प्रमुख होता. धनंजय मुंडे आधी असे नव्हते काय होतास तू काय झालास तू, अशी टीका आमदार सुरेश धस यांनी केलीय. धनंजय मुंडे आधी असे नव्हते, 'मात्र आता काय होतास तू काय झालास तू'; मस्साजोग सरपंच हत्येवर आमदार सुरेश धस यांची टीका माझ्या बूथ प्रमुखाची हत्या झाली. संतोष देशमुख हा भाजपचा बूथ प्रमुख होता. त्यामुळे मी या प्रकारात जास्त सहभागी आहे. धनंजय मुंडे तुम्ही संतोष देशमुख यांच्या खून प्रकरणात समर्थन देत आहात का? आणि गोपीनाथ गडावरून हे बोलता? तुम्ही कोणत्या दुनियेत वागताय? तुमची स्टाईल कशी आहे धनु भाऊ? तुम्हाला सिरियसनेस काय आहे, हे गँग ऑफ वासेपूर आहे असल्याची टीका करत भाजपचे आमदार सुरेश धस यांनी बीड जिल्ह्याच्या केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणावर भाष्य केले.**

माधव जाधव प्रकरणात त्याची काय चूक होती. कोठे गुन्हे दखल केले जात आहे? डॉक्टर वर गुन्हा दाखल केला हे खरं आहे का? आता पर्यंत किती प्रकरण झाले? बबन गित्ते खरचं आरोपी होता का? परळीत सांगतो या प्रकरणात किती आरोपी होते, या प्रकरणात मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री लक्ष देणार नाही. धनंजय मुंडे आधी असे नव्हते काय होतास तू काय झालास तू, असे ही आमदार सुरेश धस म्हणाले. आरोपींना १५ दिवसांचा पीसीआर मिळाला ही समाधानाची बाब बीड जिल्ह्याच्या केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या अमानवी खुनाच्या प्रकरणात बाळासाहेब कोल्हे यांची नियुक्ती केली आहे. काल रात्री मी एसआयटी संदर्भात विचारणा केली आणि मुख्यमंत्री यांनी कालच पत्रावर सही केली. त्यामुळे लवकरच एसआयटी स्थापन होईल. संतोष देशमुख हत्या अमानवी घटना घडली आहे. मी न्यायालयाचे आभार मानतो. आरोपींना १५ दिवसांचा पीसीआर मिळाला ही समाधानाची बाब आहे. सीआयडी अधिकाऱ्यांना तपास करण्यासाठी गती मिळेल. आयजी लेवलचे अधिकारी, ज्युडिशिअल तपासणी होणार यासाठी मुख्यमंत्र्यांनी मनावर घेतले आहे. दरम्यान आता बीड जिल्हा एकवटनार आहे. गृहमंत्र्यांनी सकारात्मक निवेदन केले आहे. जे उद्योग अधिकाऱ्यांनी केले आणि त्यांच्यावर कारवाई झाली, यावरून कायदा नावाची गोष्ट राहिली की नाही हा प्रश्न आहे. ॲक्शन आता सुरू झाली आहे. जे अधिकारी दिले त्यांचं काम समाधानकारक आहे. पोलीस, सीआयडीहे सर्व याचा तपास करत आहे. पोलीस उर्वरित आरोपींना अटक करतील. मात्र या प्रकरणात अविश्वास दाखवून चालणार नसल्याचे म्हणत भाजपाचे आमदार सुरेश धस यांनी या प्रकरणावर भाष्य केलंय.मुख्यमंत्र्यांनी, अजितदादांनी या जिल्ह्याचे पालकत्व स्वीकारावे छोटा आका आत गेला असून कराड ३०२ चे प्रमुख सूत्रधार आहेत. अराजकता परळीत जाऊन पहा, काय अवस्था आहे. यांना लवकर



अटक करावी. एसआयटी स्थापन होईल, राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी पालकत्व स्वीकारावे किंवा अजितदादांनी या जिल्ह्याचे पालकत्व स्वीकारावे. मागचे पालकमंत्री होते त्यांनी पालकमंत्री पद आणि मंत्रीपद भाड्याने दिले होतं. मी पण २८ तारखेच्या मोर्चाला उपस्थित राहणार आहे. ◀◀ पान २ वर

## आजच्या डिजिटल युगातील ग्राहकांच्या हक्कांची चर्चा होणे गरजेचे-जिरंगे



वडवणी । पतिनिधी

**मंगळवार दि. २४ डिसेंबर रोजी तहसिल कार्यालय वडवणी येथे राष्ट्रीय ग्राहक दिन दरवर्षीप्रमाणे नायब तहसीलदार संजय जिरंगे साहेब यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला. २४ डिसेंबर रोजी भारतीय 'ग्राहक दिन' साजरा केला जातो. या पार्श्वभूमीवर आजच्या डिजिटल युगातील ग्राहकांच्या हक्कांची चर्चा होणे गरजेचे आहे. सध्या ऑनलाइन शॉपिंग आणि ई-कॉमर्सचा प्रचंड विस्तार झाला आहे. त्यामुळे ग्राहकांसमोर नवनवीन आव्हाने निर्माण झाली आहेत. त्यामुळेच बनावट उत्पादने, सायबर फसवणूक आणि गोपनीयतेचे उल्लंघन यासंबंधीच्या अधिकारांबद्दल त्यांनी जागरूक असणे महत्त्वाचे आहे.**

आजच्या जगात ग्राहक हा राजा आहे. देशाची तसेच जगाची अर्थव्यवस्था भोवती फिरत असल्यामुळे ग्राहकाचे महत्त्व कमालीचे वाढले असून सगळी आर्थिक यंत्रणाच त्याच्याभोवती फिरत असल्याचे चित्र दिसते. त्यामुळेच दर वर्षी २४ डिसेंबर रोजी साजऱ्या होणाऱ्या भारतीय ग्राहक दिनाला अलीकडे ◀◀ पान २ वर



## थंड वाऱ्याने लाटेची चाहूल अंबाजोगाईकर गारठले

अंबाजोगाई प्रतिनिधी

तालुक्यातील वातावरणात अचानक बदल झाला असून मागील काही दिवसांपासून सूर्यदर्शन दिवसभर होते आहे; परंतु थंड वारे वाहत असल्याने हवामानात गारवा निर्माण आहे कमाल,किमान तापमानाचा कमी अधिकपणा यासह इतर माहिती हवामानाचा अंदाज व्यक्त करणाऱ्या संस्था चिकलठाणा वेधशाळेच्याअंदाजाचा आधार घेत देताना दिसत आहेत. दरम्यान, दररोज सायंकाळपासून मात्र तापमानाचा पारा घसरतो तापमान कमी ◀◀ पान २ वर

## व्यापारी महासंघाच्या अध्यक्ष प्रिया जोशी तर सचिवा संगिता पांगारकर

जालना । प्रतिनिधी

कॅन्फडरेशन ऑफ आल इंडिया ट्रेडर्स (कॅट) अंतर्गत व्यापारी महासंघ जिल्हा जालना च्या महिला आघाडीची बैठक मराठवाडा विभागीय अध्यक्ष हस्तीमलजी बंब यांच्या अध्यक्षते खाली रूची प्रॉडक्ट महिला गृह उद्योग यांच्या कार्यालयात दि. २२ डिसेंबर, रविवार रोजी घेण्यात आली. प्रारंभी मराठवाडा विभागीय महिला सचिवा सौ. आनंदी अय्यर यांनी उपस्थित सर्वांचा शब्द सुमनाने स्वागत करून आजच्या बैठकीचे उद्देश सांगताना सौ. सिता मोहिते




पाटील यांची मराठवाडा स्तरीय निवड मागील महिण्यात करण्यात आल्यामुळे येथील महिला कार्यकारणीची नवीन निवड करणे गरजेचे आहे, जिला महिला अध्यक्षा म्हणून सौ. प्रिया जोशी यांचे नाव सुचविले. उपस्थित सर्वांनी एकमताने स्वीकृती दिली. श्री हस्तीमलजी बंब यांनी मार्गदर्शन करताना पुढील महिला कार्यकारणीची चर्चेत ठरविल्या प्रमाणे घोषणा करताना उपाध्यक्ष पदी श्रीमती प्रतिभा खाडे, सचिवा सौ. संगिता पांगारकर कार्यकारिणी सदस्य म्हणून सौ. सुर्वणा जोशी, सौ. अनुसया देवकाते, सौ. सुनिता ◀◀ पान २ वर

## संस्कार भारतीच्या देवगिरी प्रांत कार्यकारिणीची घोषणा



सर्वसाधारण सभा संस्कार भारतीचे अखिल भारतीय मंत्री आशुतोष आडोनी आणि पश्चिम क्षेत्र प्रमुख चंद्रकांत घरोटे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली,यावेळी संस्कार भारती देवगिरी प्रांताची नवी रचना आणि संपूर्ण पदाधिकाऱ्यांच्या निवडी जाहीर करण्यात आल्या.

संपूर्ण कार्यकारिणी- संरक्षक- भरतअण्णा लोळगे,सल्लागार- सुधीर कोषप्रमुख संजय घायाळ,मातृशक्ती प्रमुख गीता रावतोळे,मंचीय कला संयोजक -डॉ जयंत शेवतेकर,संगीत पं. संजय जोशी, सहसंगीत दिलीप चौधरी,नृत्य- रमा करजगावकर आणि विक्रांत वायकोस, नाट्य- निलेश देशपांडे,सहनाट्य विजय करभाजन आणि गिरीधर पांडे,दृश्य कला संयोजक शेषनाथ वाघ,सह संयोजक संतोष पाठक,भू-अलंकरण अमित देशपांडे,छायाचित्र-फोटोग्राफी पद्माकर मोकासे,चित्रकला- केदार नाईक, सह चित्रकला- अनिल पाटील,लोककला संयोजक डॉ.मार्तंड कुलकर्णी,सह संयोजक डॉ.वैशाली गोस्वामी,सारंग रोकडे,शेखर भाकरे,साहित्य विधा संयोजक डॉ.विद्यासागर पाटांगणकर, सह संयोजक नारायण पांडव आणि धनंजय गुडसुरकर,कला धरोहर संयोजक प्रा.दत्तप्रसाद गोस्वामी,सह संयोजक- अजय कासोदेकर,प्रचार व प्रसिद्धी प्रमुख- महेश वाघमारे, कार्यकारिणी सदस्य जयेंद्र कुलकर्णी. या सर्व पदाधिकाऱ्यांचे यावेळी गुलाब पुष्प देऊन अभिनंदन करण्यात आले.विशेष सर्वसाधारण सभेचा प्रारंभ संस्कार भारती ध्येयगीत गायन, दीपप्रज्वलन, ◀◀ पान २ वर

## धनादेश न वटल्या प्रकरणी आरोपी महिलेस शिक्षा व फिर्यादिस नुकसानभरपाई देण्याचे न्यायालयाचे आदेश

अंबाजोगाई । प्रतिनिधी

**२ रे न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांचे न्यायालयात एस.एस.सी.क्र.२६१/२०१२ त्रिदल माजी सैनिक पतसंस्था वि.तोळाबाई या प्रकरणाची सुनावणी होऊन आरोपी तोळाबाई दादाराव जोगदंड रा. परळी वेस अंबाजोगाई हिस कलम १३८ निगोशियबल इंस्ट्रूमेन्ट ॲक्ट प्रमाणे दोषी ठरवून मा. न्या.एस.डी. मेहता साहेब यांनी न्यायालय उठेपर्यंत शिक्षा व धनादेशावरील रक्कम ५८,१७०/- रुपये फिर्यादी पतसंस्थेस देण्याचे आदेश दिले.**



सदरील प्रकरणाची थोडक्यात हकीकत अशी की, आरोपी तोळाबाई दादाराव जोगदंड रा. परळी वेस अंबाजोगाई यांनी फिर्यादी त्रिदल माजी सैनिक सहकारी पतसंस्था अंबाजोगाई यांचेकडे २००७ मध्ये कर्ज मागणी केल्यावरून फिर्यादी पतसंस्थेनं आरोपी हिस ३००००/- तीस हजार रुपये कर्ज दिले. परंतु आरोपीने सदरचे कर्ज न भरल्यामुळे फिर्यादीने आरोपीकडे असलेली कर्ज थकबाकी रक्कम रु.५८,१७०/- ची मागणी केली असता आरोपीने तिचे खाते असलेल्या अंबाजोगाई पीपल्स को-ऑप बँक शाखा अंबाजोगाई चा धनादेश दिला.सदरील धनादेश फिर्यादीने बँकेत वाढविण्यासाठी लावला असता आरोपीच्या खात्यात पुरेशी रक्कम नसल्याने तो न वठता परत आला.त्यामुळे फिर्यादी पतसंस्थेने वकील साहेब मार्फत धनादेश न वठल्या बाबत व कर्जाची रक्कम भरण्याबाबत नोटीस दिली असता सदर नोटीस आरोपीस मिळूनही आरोपीने सदरची रक्कम फिर्यादी पतसंस्थेकडे न जमा केली नाही. त्यामुळे फिर्यादी पतसंस्थेतर्फे ◀◀ पान २ वर

## लोकमान्य टिळक विद्यालयात अहिल्यादेवी होळकर यांच्या चित्रप्रदर्शनीचे आयोजन



अंबाजोगाई । प्रतिनिधी

**पोखरी येथील लोकमान्य टिळक विद्यालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्म त्रिशताब्दी वर्षा निमित्त दि.२३ डिसेंबर २०२४ सोमवार रोजी अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनातील विविध प्रसंगावर आधारित चित्रप्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले होते.**

विद्यालयातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जन्म त्रिशताब्दी स्थानिक समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या चित्रप्रदर्शनीचे उद्घाटन अंबाजोगाई येथील राजर्षी शाहू नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष राजू मोरे यांच्या हस्ते करण्यात ◀◀ पान २ वर

## पिंपळनेर हद्दीत शेतकऱ्यावर प्राणघातक हल्ला; दुचाकी जाळली





पिंपळनेर । प्रतिनिधी

**शेतात राखण करण्यासाठी गेलेल्या शेतकऱ्याला बेदम मारहाण करत मोटार सायकल जाळून टाकल्याची घटना पिंपळनेर पोलीस ठाणे हद्दीतील लिंबारूई देवी येथे रविवारी रात्री घडली.**

मारहाण झालेल्या शेतकऱ्याचं जगन्नाथ ज्ञानोबा नांदे वय ५७ वर्ष असं नाव आहे. पिंपळनेर पोलीसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला आहे दरम्यान शेतकरी दि.२२ रोजी वार रात्री ८ वाजण्याच्या सुमारास शेतात गहू ,हरभरा , भुईमूग पिकासाठी पाणी देणे, वन्यप्राण्यांपासून बचाव करण्यासाठी पिकांची राखन करण्यासाठी शेतातच बाज टाकून शेतात बाजावर ◀◀ पान २ वर




## अधिकारी , कर्मचाऱ्यांनी सेवा पुस्तके अद्ययावत करून घ्यावीत - तहसिलदार शेळके

बीड । प्रतिनिधी

तहसिल कार्यालय बीड येथील सर्व अधिकारी / कर्मचारी यांनी आपली सेवापुस्तके अद्ययावत करून घ्यावीत , यास्तव तहसिलदार चंद्रकांत शेळके यांनी कॅम्पचे आयोजन केले आहे . मंगळवार २४ डिसेंबर रोजी तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी कॅम्पच्या ठिकाणी भेट देऊन काही सेवा पुस्तके तपासली व त्यावर सह्याही केल्या . यावेळी अधिकारी / कर्मचारी यांना मार्गदर्शन करत असताना त्यांनी नमूद केले की , शासनाने आपली नेमणूक जनतेच्या सेवेसाठी केलेली असून आपण सर्वांनी जनतेची कामे विहित वेळेत पार पाडली पाहिजेत. तथापि आपण सेवा करत असताना आपल्या सेवेचा आरसा म्हणजे आपले



सेवापुस्तक सुव्यवस्थित करुन घ्यावे . वेळोवेळी निघालेल्या आदेशान्वये आपल्या जबाबदाऱ्या , वेतनवाढ , वेतननिश्चिती , विशेष बाबी इ. सेवा विषयक बाबींच्या अनुषंगाने आवश्यक ते दस्ताऐवज उपलब्ध करून अद्ययावत करून घेण्याचे आवाहन केले . सेवापुस्तिका हे एक असे दस्तऐवज आहे की, ◀◀ पान २ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पुण्यासाठी स्वतंत्र महापालिकेचा विचार करण्यास आणखी उशीर होऊन चालणार नाही–चंद्रकांत पाटील

**पुणे | प्रतिनिधी**

**'पुणे शहरामध्ये एक महापालिका असुन चालणार नाही, शहराचा राजकीय, सामाजिक व भौगोलिक विचार करून शहराचे काही भाग करावे लागतील. आता फार उशीर करून चालणार नाही. पीएमआरडीए म्हणजे महापालिका नाही, हा विचार करून पुण्यासाठी दोन स्वतंत्र महापालिका करण्याशिवाय पर्याय नाही.' असे मत राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी मंगळवारी व्यक्त केले.**

पुणे श्रमिक पत्रकार संघाच्यावतीने विधानसभा निवडणुकीत निवडुन आलेल्या नवनिर्वाचित आमदारांसमवेत मंगळवारी वार्तालाप कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी नगरविकास, अल्पसंख्यांक विकास, वैद्यकीय शिक्षण, सामाजिक न्याय व परिवहनच्या राज्यमंत्री माधुरी मिसाळ, आमदार भीमराव तापकीर, आमदार सिद्धार्थ शिरोळे, आमदार चेतन तुपे, आमदार बापू पठारे, पत्रकार संघाचे अध्यक्ष सुनीत भावे, सरचिटणीस मीनाक्षी गुरव आदी यावेळी उपस्थित होते. ''महायुती सरकारच्या पहिल्या टप्प्यात राज्याच्या व पुण्याच्या विकासाला गती मिळाली आहे. मात्र, मध्यंतरीचे सत्ताबदल, कोरोना यांसारख्या कारणांमुळे विकासाची गती विस्कळीत झाली. समान पाणी पुरवठा योजना, जायका प्रकल्पासारख्या मोठ्या प्रकल्पांवर त्याचा परिणाम झाला आहे. शहरासाठी बसची संख्या वाढविण्यावर भर देऊ. महापालिकेत सध्या प्रशासक राज असले तरीही, सामान्यांचे प्रश्न सोडवु. महापालिका निवडणुकीपुर्वी शहरातील समस्या सोडवु. शहराच्या गतीमान विकासाला आम्ही प्राधान्य देऊ. समाविष्ट गावांच्या अनेक समस्या आहे, त्या सोडविण्यासही आमचे प्राधान्य असेल.




शहराचे नागरीकरण झपाट्याने वाढत आहे, त्यामुळे पाण्याची समस्या निर्माण होत आहे, कात्रज परिसरात मोठा बंधारा बांधून शहरासाठी पाणी उपलब्ध करून देण्याचा विचार आम्ही करत आहोत. वाढत्या लोकसंख्येचा विचार करून पुढील नियोजन करण्यावर भर देऊ.' शहरातील महत्वाचे रस्ते, सेवा रस्ते तसेच मोठे प्रकल्प प्रलंबित आहेत. भूसंपादनासाठी नागरीकांकडुन रोख मोबदल्याची मागणी होत आहे. हा प्रश्न सोडविण्यासाठी ''क्रेडीट नोट' सारख्या पर्यायांचा विचार आपल्याला करावा लागेल. खडकवासला ते खराडी मेट्रोचे कामाला गती मिळावी, समाविष्ट गावांचे प्रश्न सोडविण्यासाठी जादा निधी मिळावा, गावे विकसीत होईपर्यंत ग्रामपंचायत दरानेच कर आकारला जावा, यासाठी आम्ही पाठपुरावा करू.' ''समाविष्ट गावे व वाढत्या लोकसंख्येचा पुणे महापालिकेवर ताण पडत आहे, त्यासाठी पुण्याच्या पूर्व व पश्चिम अशा दोन स्वतंत्र महापालिका कराव्या लागतील' असे तुपे यांनी नमूद केले. तुपे म्हणाले, ''वाहतूक, पाणी, आरोग्य, कायदा सुव्यवस्था, शिक्षण, क्रीडा, पर्यावरण व स्वच्छता या विषयांवर शहराचा भविष्यातील आराखडा तयार करावा. भविष्यातील मेट्रो मार्ग भुयारीच असावेत. शहरात समान पाणीपुरवठा योजना कार्यान्वित व्हावी आणि अमली पदार्थांच्या विक्रीला आळा घालण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठासमोरील आचार्य आनंदऋषीजी चौकातील उड्डाणपूल दोन तीन महिन्यात वापरासाठी खुला होईल. रिंगरोडसाठी पाठपुरावा आम्ही करत आहोत. हिंजवडी–शिवाजीनगर मेट्रो येत्या वर्षात सुरु होईल. महापालिकेचे विविध प्रकल्प मार्गी लावण्याबरोबरच सार्वजनिक स्वच्छतागृहांचे लेखापरीक्षण करण्यास प्राधान्य देऊ.' कार्यक्रमाचे सूत्रसंचाल अश्विनी जाधव केदारी यांनी केले. शहरातील पाणी समस्या, वाहतुक समस्या बिकट होत आहे. वाहतुक कोंडीवर पर्याय म्हणून नदीकाठाने वारजे ते थेऊरपर्यंत रस्ता करण्याची गरज आहे. विकास आराखड्यातील रस्ते झाले पाहीजेत.त्यादृष्टीने प्रयत्न करू. शासकीय जागांवरील झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन करून संबंधित जागा सार्वजनिक कारणांसाठी उपयोगात आणल्या पाहीजेत, असे पठारे यांनी सांगितले.

# पुण्यात गुन्हेगारी वाढली!

## कामगाराला भोसकून लुटण्याचा प्रयत्न ; दोघांना अटक

**पुणे | प्रतिनिधी**

**पुणे स्टेशन परिसरात हॉटेल कामगाराला भोसकून त्याच्याकडील रोकड लुटण्याच्या प्रयत्न करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. पोलिसांनी दोघांना अटक केली आहे. गौरव भारत धोकडे (वय १९), आकाश बाळू कांबळे (वय १९, दोघे रा. लष्कर) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. आरोपींनी केलेल्या हल्ल्यात आत्माराम धर्मा आडे (वय ४२, रा. अशोकनगर, येरवडा, मूळ रा. आर्णे, जि. यवतमाळ) जखमी झाले आहेत. याप्रकरणी बंडगार्डन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

आडे क्वीन्स गार्डनमधील एका क्लबच्या आवारातील हॉटेलमध्ये वेटर आहे. सोमवारी मध्यरात्री काम संपवून ते घरी निघाले होते. स्टेशन परिसरातील अलंकार टॉकीजजवळ ते रिक्षाची वाट पाहत थांबले होते. तेव्हा आरोपी धोकडे आणि कांबळे दुचाकीवरुन आले. त्यांनी आडे यांच्याकडे ५०० रुपये मागितले. आडे यांनी नकार दिल्यानंतर आरोपींनी त्यांच्याकडील कोयता काढून पोटाला लावला. कोयत्याने भोसकून आरोपी पसार झाले. जखमी



अवस्थेतील आडे यांनी याबाबतची तक्रार पोलिसांकडे दिली. पोलिसांनी त्यांना तातडीने ससून रुग्णालयात दाखल केले. पोलिसांनी तपास करुन पसार झालेल्या आरोपींना पकडले. पोलीस उपनिरीक्षक चव्हाण अधिक तपास करत आहेत. गेल्या काही दिवसाखाली भरदुपारी कर्वे रस्त्यावरील प्रसिद्ध महाविद्यालय परिसरात फिल्मीस्टाईल टोळक्याने हातात कोयते घेऊन पाठलाग करत दोन तरुणांवर कोयत्याने वार केले. यात एका तरुणाची प्रकृती चिंताजनक असून, त्याच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. तर, दुसऱ्याला डोक्यात वार करून जखमी केले आहे. भरदुपारी घडलेल्या याघटनेमुळे महाविद्यालय परिसरात चांगलाच गोंधळ निर्माण झाला होता. धक्कादायक म्हणजे, मैत्रिणीबद्दल अफवा पसरवतोय या संशयावरून टोळक्याने वार केले आहेत. घटनेची माहिती मिळताच परिमंडळ एकचे उपायुक्त संदिपसिंह गिल्ल व डेक्कन पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी जखमी असलेल्या तरुणांकडे चौकशी केली आहे. त्यानुसार गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. दरम्यान, पसार झालेल्या तरुणांचा शोध घेतला जात आहे. राज्यात गुन्हेगारीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. दरम्यान गेल्या काही दिवसाखाली छत्रपती संभाजीनगरमध्ये जुन्या भांडणाच्या कारणातून २६ वर्षीय तरुणाचा धारदार शस्त्राने खून करण्यात आला. ही घटना सोमवारी (दि.२) सायंकाळी हसूल परिसरातील कारागृहाच्या बाजूच्या मैदानावर घडली. दिनेश उर्फ बबलू परमानंद मोरे (वय २६, रा. चेतनानगर, हसूल) असे मृत तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी आरोपी अनिकेत गायकवाड व गणेश सोनवणे यांची नावे समोर आली असून, शोधासाठी चार पथके रवाना झाली. या हत्येप्रकरणामुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

## वाघोलीत सलग दुसऱ्या दिवशी डंपरचा अपघात दुचाकीस्वाराला उडवलं, तरुण गंभीर जखमी

**पुणे | प्रतिनिधी**

**शहरातील वाघोली केसनंद परिसरामध्ये रविवारी रात्री भीषण अपघात झाला होता. अमरावतीवरून कामासाठी पुण्यात आलेल्या ९ जणांना डंपरने चिरडलं. पुण्यात काम शोधण्यासाठी आलेल्या या कामगारांनी फुटपाथवर आसरा घेतला होता. पण भरधाव वेगाने आलेल्या डंपरने ९ जणांना चिरडले. यामध्ये ३ जणांचा मृत्यू झाला. तर ६ जण गंभीर जखमी झाले. ही घटना ताजी असतानाच वाघोलीत सलग दुसऱ्या दिवशी डंपरचा अपघात झाल्याची घटना घडली आहे.**

वाघोलीत ऋहायवा डंपरने दुचाकीस्वाराला जोरदार धडक दिली. या धडकेत दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला आहे. ऋसाईराज देशमुख असे या जखमीचे नाव आहे. वाघोलीतील वाघेश्वर मंदिर या ठिकाणी अपघात झाला. काल वाघोलीत केसनंद फाट्यावर एका डंपरने नऊ जणांना चिरडल्यानंतर आज सलग दुसऱ्या दिवशी डंपरचा अपघात झालाय. पोलीस प्रकरणाचा तपास करत आहेत. दरम्यान, वाघोलीमध्ये डंपरने ९ जणांना चिरडल्याप्रकरणी पोलिसांनी चालकाला अटक केली असून त्याला पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. तर अपघाताप्रकरणी डंपर चालक गजानन तोटरे याच्यावर वाघोली पोलीस ठाण्यात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर या घटनेतील मृतांच्या नातेवाईकांना पाच लाख रुपयांची शासकीय मदत, तर जखमींच्या उपचाराचा संपूर्ण खर्च शासनाकडून केला जाणार आहे. जालना येथे देखील आज बसचा भीषण अपघात झाला आहे. जालना जिल्ह्यातील जाफ्राबादहून चिखलीकडे जाणाऱ्या बसला कोळेगाव फाट्याजवळ भीषण अपघात झाला. कोळेगाव घाटरस्ता चढताना बस २० फूट खोल खड्ड्यात कोसळली. या अपघातात १५ ते १६ प्रवासी जखमी झाल्याची माहिती मिळत आहे. जखमींमधील तीन जणांची प्रकृती गंभीर आहे. जखमींना चिखली येथील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. बसचा स्टेअरिंग रॉड तुटल्याने अपघात झाल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. गुजरात राज्याकडून अकोला येथे जाणाऱ्या लक्झरी बसचा जळगाव जिल्ह्यातील धरणगाव तालुक्यातील वराडसिम गावाजवळ भीषण अपघात झाल्याची घटना घडली. या घटनेत एक महिला जागीच ठार तर, दहा ते पंधरा प्रवासी जखमी झाले आहेत. जखमींना जळगाव येथील जिल्हा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

## सासवडमध्ये चोरट्यांचा सुळसुळाट; उद्योजकांची घरे टार्गेटवर

**पुणे | प्रतिनिधी**

**पुरंदर तालुक्यात गेल्या काही महिन्यात चोरीच्या घटनांत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. तालुक्याचे प्रमुख शहर असलेल्या सासवडमध्ये यामध्ये प्रचंड वाढ झाली आहे. विशेष म्हणजे चोरट्यांनी सासवड मधील उद्योजकांची घरेच टार्गेट केली असून वेगवेगळ्या घटनांत लाखो रुपयांचे सोने, चांदीचे दागिने आणि रोख रक्कम पळविण्यात आली आहे. केवळ एखाद्या रात्री घर बंद दिसले की, घरफोडी नक्की हे सूत्र दिसून येत आहे. एवढ्या मोठ्या घटना होवून एकाही घटनेचा तपास लावण्यात पोलिसांना यश आलेले नाही. त्यामुळे चोरट्यांचे मनोबत दिवसेंदिवस वाढत असून पोलीस यंत्रणा काय करीत आहे? आणि उद्योजकांच्या घरांवरील चोरीचे सत्र कधी थांबणार? असे प्रश्न उपस्थित होत आहेत.**

काही दिवसापूर्वीच सासवडमधील मंडलाधिकारी सुधीर बडदे यांच्या घरातून तब्बल १२ तोळे सोन्याचे दागिने चोरीस गेल्याची घटना घडली आहे. याबाबत संबंधित कुटुंबीयांनी संशयित व्यक्तीचे नाव सांगून गुन्हा दाखल करण्यास तब्बल एक महिना लावला. त्यानंतर दागिने अद्याप मिळालेले नाहीत, अथवा काहीही कारवाई झाल्याचे दिसून येत नाही. दोन, तीन महिन्यापूर्वी सासवडमधील धुमाळ पेट्रोल पंपचे मालक धुमाळ यांचेही घर फोडले होते. या घटनेत सोने चांदीचे दागिने तसेच मोठ्या प्रमाणात रोख रक्कम चोरट्यांनी चोरून नेली आहे. मात्र केवळ गुन्हा दाखल होण्याव्यातिरिक्त कोणतीही कारवाई झाल्याचे दिसून आले नाही. पंधरा दिवसापूर्वीच सासवडमधील अतुल अशोक जगताप रा. जगताप आळी, पोलीस लाईन समोरील घरावर दरोडा टाकून सोने, चांदीचे दागिने आणि काही लाख रुपयांची रोख रक्कम चोरून नेली आहे. यामध्ये सहा तोळे वजनाचे सोन्याचे ब्रासलेट, तीन तोळे वजनाचे सोन्याचे साखळीतील गंठण, १.५ तोळे वजनाचे सोन्याचे काळे मण्यातील गंठण, १. २ तोळे वजनाची सोन्याची चैन, १ तोळे वजनाचे कानातील सोन्याचे झुबे वेल, ५ ग्राम वजनाचे सोन्याचे कानातील टोप्स, तसेच चांदीचे ताट, ग्लास या दागिन्यांसह काही रक्कमही चोरून नेली आहे. रविवारी (दि. २२) पुन्हा चोरट्यांनी एका मोठ्या उद्योजकाच्या घरावर डल्ला मारून सोने चांदीचे दागिने लंपास केले आहेत. सासवड मधील भोंगळे पेट्रोल पंपचे मालक हेमंत जयवंतराव भोंगळे यांच्या घरी चोरीची घटना घडली आहे. यामध्ये सोने, चांदीचे दागिने, चांदीच्या वस्तू, रोख रक्कम, पासपोर्ट असा ऐवज लंपास करण्यात आला आहे. याबाबत त्यांनी सासवड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. एकूण घटनेचा आलेख पाहता केवळ उद्योजकांच्या घरावरच दरोड्यांचे सत्र वाढले आहे. विशेष म्हणजे रात्रीच्या वेळी दरोडे टाकून कित्येक तोळे दागिने, रोख रक्कम लंपास होत असताना पोलीस तपासात एकाही घटनेचा छडा लागला नाही. काही वर्षापूर्वी सासवड पोलीस स्टेशनमध्ये पोलीस अधिकारी आणि कर्मचारी यांची कमतरता असल्याने तपासकामे, बंदोबस्त करण्यात अडचणी येत होत्या. याबाबत वेळोवेळी आवाज उठविण्यात आला आहे. सद्यस्थितीत सासवड पोलीस ठाण्यात १ पोलीस निरीक्षक, १ सहाय्यक पोलीस निरीक्षक, ४ पोलीस उप निरीक्षक, २ बढती मिळालेले पोलीस उपनिरीक्षक असे एकूण ८ अधिकारी ५० ते ५५ पोलीस कर्मचारी एवढी संख्या असताना एकही तपास पूर्ण होताना दिसत नाही निवडणूक काळात पोलिसांकडून दररोज हॉटेलवरील बेकायदेशीर दारूविक्रीवर कारवाई होत होती.

## नाताळनिमित्त पुण्यातील 'या' भागात वाहतूकीत बदल

**पुणे | प्रतिनिधी**

**लष्कर परिसरात नाताळच्या निमित्ताने बुधवारी (२५ डिसेंबर) वाहतूकीत बदल करण्यात आला आहे. संभाव्य गर्दी विचारात घेऊन या भागातील वाहतूक व्यवस्थेत बदल केले आहेत. गर्दी वाढल्यानंतर महात्मा गांधी रस्ता (एम. जी. रोड) वाहतुकीस बंद करण्यात येणार असून, वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात येणार आहे.**

नाताळानिमित्त लष्कर भागासह शहरातील विविध भागात तसेच उपनगरातील नागरिक मोठ्या संख्येने गर्दी करतात. मध्यरात्रीपर्यंत मोठी गर्दी काही भागांमध्ये असते. त्यामुळे या भागातील वाहतूक सुरळीत ठेवण्यास वाहतूक व्यवस्थेत बदल केले आहेत. तसेच, महात्मा गांधी रस्त्यावर गर्दी वाढल्यास वाहतूक बंद ठेवण्यात येणार आहे. वाहनचालकांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त अमोल झेंडे यांनी केले आहे. लष्कर भागातील वाहतूक व्यवस्थेत बुधवारी सायंकाळी ७ पासून बदल करण्यात येणार आहेत. गर्दी ओसरेपर्यंत या भागात वाहतूक बदल लागू राहणार आहेत. वाय जंक्शन येथून महात्मा गांधी रस्त्याकडे येणारी वाहतूक १५ ऑगस्ट चौक येथे बंद करण्यात येणार आहे. या भागातील वाहतूक कुरेशी मशीद, सुजाता मस्तानी चौकातून वळविण्यात येणार आहे. इस्कॉन मंदिराकडून अरोरा टॉवर्सकडे येणारी वाहतूक डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा चौकातून तीन तोफा चौकाकडे सोडण्यात येणार आहे. व्होल्गा



चौकातून महंमद रफी चौकाकडे जाणारी वाहतूक बंद ठेवण्यात येणार असून, या भागातील वाहतूक ईस्ट स्ट्रीटमार्गे इंदिरा गांधी चौकाकडे सोडण्यात येणार आहे. इंदिरा गांधी चौकातून महावीर चौकाकडे जाणारी वाहतूक बंद ठेवली जाणार आहे. इंदिरा गांधी चौकातून वाहने लष्कर पोलीस ठाण्याकडे वळविण्यात येणार आहे. सरबतवाला चौकातून महावीर चौकाकडे जाणारी वाहतूक बंद ठेवण्यात येणार आहे. या भागातील वाहने ताबुत स्ट्रीटमार्गे जातील, असे वाहतूक शाखेकडून कळविण्यात आले आहे. आपल्या भारत देशामध्ये विविध जाती आणि धर्माचे लोक एकजुटीने राहतात, त्यामुळे भारताला सर्वधर्म समभाव असलेला देश म्हणून संबोधले जाते. प्रत्येक धर्मातील सण, उत्सव, संस्कृती, परंपरा वेगवेगळ्या असतात. 'विविधतेत एकता असणार्या आपल्या देशामध्ये प्रत्येक धर्माचे लोक आपापले सण मोठ्या उत्सहाने साजरा करतात आणि देशभरातील लोक हे हे सणही मोठ्या उत्साहात व एकोप्याने साजरे करतात. 'नाताळ' म्हणजेच 'क्रिस्टमस' हा त्या सणांपैकी ख्रिश्चन धर्मियांचा सर्वात महत्वाचा सण.

## भैरवीच्या 'इंटरनॅशनल फूड फेस्टिवल'ला प्रतिसाद

**पुणे | प्रतिनिधी**

**चोखंदळ खवाय्यांच्या जिभेवर चव रेंगाळत ठेवणाऱ्या 'भैरवी प्युअर व्हेज' यांच्यावतीने 'इंटरनॅशनल फूड फेस्टिवल'चे आयोजन करण्यात आले आहे. त्याला खवय्यांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. 'मल्हार माची', 'जलसृष्टी' अशा दर्जेदार रिसॉर्टची साखळी असलेल्या आणि मागील २२ वर्षांपासून हॉटेल व्यवसायामार्फत ग्राहकांच्या जिभेची चव टिकवून ठेवण्यास या समूहाला यश आले आहे.**

'भैरवी'तर्फे दरवर्षी श्रावणात 'बिर्याणी आणि कबाब' महोत्सव आयोजित केला जातो. त्याच धर्तीवर गेली नऊ वर्षे हा 'इंटरनॅशनल फूड फेस्टिवल' भरवला जातो. डिसेंबरच्या गुलाबी थंडीत हा फेस्टिव्हल म्हणजे खव्वयांसाठी पर्वणीच! यंदा या फेस्टिवलचे उद्घाटन प्रसिद्ध उद्योगपती सोनाई डेअरीचे मॅनजिंग डायरेक्टर दशरथ माने यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले. यावेळी माने यांनी 'भैरवी'च्या कर्मचाऱ्यांशी संवाद साधत 'सोनाई डेअरी'चा प्रवास उलगडला. भारतातील दुग्ध व्यवसाय आणि त्याच्याशी संलग्न असलेल्या विविध संबंधित प्रश्नांची उत्तरे त्यांनी दिली.



दरम्यान, या इंटरनॅशनल फूड फेस्टिवलमध्ये ग्राहकांना विविध देशांतील खाद्य संस्कृतीमधून तयार होणाऱ्या वेगवेगळ्या डिशेस चाखायला मिळणार आहेत. यामध्ये खवय्यांनी इंटरनॅशनल फूड फेस्टिवल'ला ३० डिसेंबरपूर्वी भेट द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. स्टार्टर्स पदार्थांत वाइल्ड मशरूम कॅपेचिनो सूप, डिमसम, सुशी, क्रंची बेसील, कॉटेज चीज, मेझे प्लॅटर, मशरूम अरेन चिनी बॉल्स, बँकॉक स्टाइल जिंजर मशरूम उपलब्ध आहेत. तर, मेन कोर्समध्ये बर्मी खाउसे, ईडमामे, ब्लू पी फ्रायड राइस, गुई नूडल्स, शेफ स्पेसिअल सिझलरस, फातूस सलाड, सनड्राय टोमॅटो, ऑलिव्ह पिझ्झा या आणि अशा अनेक आंतरराष्ट्रीय डिशेशचा आस्वाद घेता येणार आहे.

# कोयता गँगचा विध्वंस!

## रस्त्यावरुन जाणाऱ्या वाहनांवर कोयत्यानं वार करत माजवली दहशत, घटनेचा तळवशे व्हायरल

**पुणे | प्रतिनिधी**

**पुण्यात कोयता गँगची दहशत सुरुच असून लोहगाव येथील साठे वस्ती परिसरात दोन तरुणांनी कोयता आणि दगडांचा वापर करून वाहनांची तोडफोड करत दहशत माजवली आहे. या घटनेचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत आहे. दोन तरुणांनी परिसरातील गाड्या, दुकानं, तसेच रस्त्यावरून येणाऱ्या–जाणाऱ्या वाहनांवर कोयत्याने वार करत तोडफोड केली. या कृत्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. घटनास्थळी झालेल्या तोडफोडीमुळे स्थानिकांना मोठ्या प्रमाणावर त्रास सहन करावा लागत आहे.**

सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडिओत हे तरुण कोयता हातात घेऊन परिसरात उघडपणे दहशत निर्माण करत असल्याचे दिसत आहे. या प्रकारामुळे साठे वस्ती परिसरात गोंधळाचं वातावरण निर्माण झालं आहे. पोलिसांनी याबाबत तत्काळ दखल घेतली असून आरोपींचा शोध घेतला जात आहे. पोलिसांनी नागरिकांना शांत



राहण्याचं आणि घाबरून न जाण्याचं आवाहन केलं आहे. स्थानिक रहिवाशांनी घडलेल्या प्रकारामुळे पोलिसांकडे तक्रार नोंदवली असून, दोषींवर कारवाईची मागणी केली आहे. दरम्यान, कोयता गँगचा हा प्रकार काही दिवसांपासून शहरात चर्चेचा विषय ठरला आहे. अशा घटनांमुळे नागरिकांच्या सुरक्षिततेबद्दल प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, पोलिसांच्या कार्यक्षमतेवरही सवाल उपस्थित केला जात आहे. या घटनेच्या तपासासाठी पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासायला सुरुवात केली आहे. याबाबत आणखी माहिती उपलब्ध होताच पुढील कारवाई होणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. भाजपचे विधानपरिषदेचे आमदार योगेश टिळेकर यांचे मामा सतीश वाघ यांचे अपहरण करुन खून करण्यात आल्याची घटना घडली होती. ही घटना पुण्यातील हडपसर परिसरात घडली होती. आता प्रकरणातील महत्वाची अपडेट समोर आली आहे. या प्रकरणातील फरार आरोपीला पुणे पोलिसांनी अटक केली आहे. गुन्हे शाखेने फरार आरोपी आतिश जाधव यास धाराशिव येथून ताब्यात घेतलं आहे. सतीश वाघ यांचं अपहरण आणि हत्या ही वैयक्तिकरणास्तव करण्यात आल्याचं पोलीस तपासात समोर आलं आहे. सतीश वाघ यांची हत्या करण्यासाठी पाच लाख रुपयांची सुपारी दिल्याची माहिती पोलीस आयुक्तांनी दिली आहे. वाघ यांच्या शेजारी राहत असलेल्या व्यक्तीने हे सर्व कृत्य केल्याचे पोलीस तपासात समोर आलं आहे. याप्रकरणी पाच पैकी चार जणांना पोलिसांनी अटक केली.